किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● अपेक्षा
५● कर्ता संगणकयुगाचा...
९● लोकसहभाग व लोकशाही व्यवस्थेसमोरील आव्हाने
१७● लोकसहभाग, लोकशाही व्यवस्था आणि माध्यमे


**अर्थबोधपत्रिका पुरवणी**

**महाराष्ट्रातील बिगर शेती रोजगार**


२७● रोजगार, उद्योग आणि शहरीकरण
३१● आकडेवारीतून सामोरे येणारे वास्तव



**खंड १० : अंक १०** **जानेवारी २०१२**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- http://www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १० (अंक १०) जानेवारी २०१२**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# अपेक्षा

नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !

चालू शतकातील दुस-या दशकातील दुस-या वर्षात आपण प्रवेश केला आहे. लोकशाहीच्या दृष्टीने हे दशक महत्त्वाचे ठरते आहे. कारण, संपूर्ण २०११ हे वर्ष देश-विदेशात जणू लोकचळवळींचे वर्ष म्हणूनच गाजले आहे. प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेसंदर्भात समाजाच्या विविध स्तरांत नांदणा-या असमाधानाचा विविधांगी प्रगट आविष्कार आपल्या देशातही आपण अनेकठिकाणी अनुभवला. लोकपाल विधेयकाच्या निमित्ताने छेडल्या गेलेल्या आंदोलनापासून ते मावळ परिसरातील पाणीवाटपाचा मुद्दा व पुण्याच्या परिसरातील टेकड्यांवरील बांधकामांना परवानगी देण्यासारख्या मुद्यांसंदर्भात लोकमताच्या संघटित भावभावनांचे उस्फूर्त आविष्करण यांत अंतर्भूत होते. प्रचलित लोकशाही व्यवस्था आणि लोकप्रतिनिधींकडून जनसामान्यांच्या असणा-या अपेक्षा, त्यांत घडून येत असलेले बदल, आपल्या अपेक्षांची तड व्यवहारात लागत नाही यांबाबत जनसामान्यांच्या मनात दाटणारा सल, मतदानापलीकडे सध्याच्या लोकशाही व्यवस्थेत अधिक सहभाग आपल्याला घेता येईल का, यांबाबत लोकांच्या मनात जागी होत असलेली उत्कंठा या सगळ्या घुसळणीमध्ये माध्यमांची भूमिका, माध्यमांचे बदलत असलेले स्वरूप, माध्यमांकडून लोकांच्या असणा-या अपेक्षा... असे अगणित कंगोरे सध्याच्या चळवळमय वास्तवाला आहेत. या व अशा पैलूंच्या अनुरोधाने काही एक अर्थपूर्ण विचारविनिमय घडून यावा, यासाठी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने लोकसहभाग व लोकशाही व्यवस्था या विषयावर डिसेंबर महिन्यात दोन चर्चासत्रांचे आयोजन केले होते. सव्वीस जानेवारी या भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य लक्षात घेऊन या विषयांवरील दोन लेख या अंकात समाविष्ट केले आहेत. अशा चर्चांमधून लोकशाहीविषयक विविध पैलूंची आपली सर्वांचीच जाण अधिक प्रगल्भ बनावी असे वाटते. लोकशाहीव्यवस्थेकडून असलेल्या अपेक्षांसंदर्भात पुढील काळ महत्त्वाचा असल्याने असे प्रगल्भ नागरिक लोकशाहीला सशक्त बनवण्यास हातभार लावू शकतील, अशी अपेक्षा आहे. ■■



# वाचकांना आवाहन

हे एक आवाहन आहे आपल्याला सर्वांना व्यक्त होण्याचे. लोकशाहीविषयक चर्चेत सहभागी होण्याचे. याला निमित्त आहे २६ जानेवारी या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने 'लोकसहभाग आणि लोकशाही' या विषयावर दोन चर्चासत्रांचे आयोजन केले होते. त्या वेळी झालेल्या भाषणांचा गोषवारा या अंकात देण्यात आला आहेच. त्या अनुषंगाने हे आवाहन करीत आहोत.

- **विषय - लोकशाहीतील लोकसहभाग**
- **अपेक्षित मुद्दे** - लोकशाहीतील लोकसहभाग कसा असावा? तो प्रभावी व परिणामकारक कसा ठरेल, त्यासाठी नेमके कोणते प्रयत्न करता येतील, लोकसहभागाचे एखादे सुयोग्य उदाहरण इत्यादी.
- प्रतिक्रिया मुद्देसूद व सुवाच्य अक्षरात लिहिलेली असावी.
- **शब्दमर्यादा १५० ते २००** शब्द
- निवडक प्रतिक्रियांना योग्य प्रसिद्धी दिली जाईल.

पत्रव्यवहारासाठी संस्थेचा पत्ता मुखपृष्ठाच्या आतील बाजूस देण्यात आला आहेच. आपल्या प्रतिक्रियांची वाट पाहत आहोत.

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**संशोधन**

# कर्ता संगणकयुगाचा...

'संगणकाशिवाय कार्यालय' ही कल्पना जगभरातील शहरी व निमशहरी भागांत आता अशक्य वाटावी, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही, असा हा संगणकयुगाचा काळ आहे. लहानथोरांच्या परिचयाचे झालेले संगणक घरोघरी नसले तरी सायबर कॅफेत जाऊ न ई-मेलने संवाद साधणे अनेकांना शक्य होते आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठीही 'ई-चौपाल'चा प्रयोग यशस्वी ठरला आहे. एका शेतक-याच्या घरी वा एखाद्या 'किऑस्क'मध्ये एक संगणक असला व त्याच्या वापराचे प्रशिक्षण एका व्यक्तीला दिलेले असले तरी ग्रामीण भागातील अनेकांना संगणकाचा 'ॲक्सेस' मिळू शकतो. Programmable Computer या संकल्पनेचे जनकत्व Charles Babbage (इ.स.१७९१-१८७१) यांच्याकडे जात असले तरी आधुनिक 'कम्प्युटर सायन्स'चा पाया घातला ब्रिटिश गणितज्ज्ञ ॲलन ट्युरिंग यांनी. आजच्या संगणकयुगाचे तेच खरे कर्ते होय. संयुक्त राष्ट्रसंघाने २०१२ हे 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून घोषित केले आहे. तसेच ट्युरिंग यांच्या जन्मशताब्दी वर्षामुळे २०१२ हे 'ॲलन ट्युरिंग वर्ष'ही मानले जात आहे.


ॲलन ट्युरिंग (१९१२-१९५४)

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस अंकगणितविषयक/मोजणीचे काम करणा-या माणसांना 'कम्प्युटर' (one who computes) म्हणत असत. माणसांकडून होणा-या चुका लक्षात घेऊ न त्या टाळण्यासाठी मोजणीचे यंत्र तयार करण्याची कल्पना Charles Babbage यांना सुचली. अशी यंत्रे तयार करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला होता. त्याबद्दल 'रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी'चे सुवर्णपदकही त्यांना १८२४मध्ये मिळाले होते.



त्यांनी तयार केलेल्या यंत्रात कोणतीही प्रणाली स्टोअर करण्यात आलेली नव्हती. ती कार्यपद्धती कार्डवर होती. ते कार्य मात्र यंत्राच्या मदतीने करणे शक्य होते. त्या काळी वीज आणि इलेक्ट्रॉनिक्स तर नव्हतेच. विजेच्या शोधानंतरही साधारणपणे १९३०च्या दशकापर्यंत या विशिष्ट यंत्रात फारशा सुधारणा वा बदल घडून आले नाहीत. या नंतरच्या काळात गणितज्ज्ञ ॲलन ट्युरिंग यांनी Algorithm, Computation आणि Turing Machine या संकल्पना मांडल्या. Turing Machine हे यंत्राचे नाव नसून ती एक संकल्पना आहे. ट्युरिंग यांचे गणिताच्या क्षेत्रातील हे कार्य फारच महत्वाचे ठरले असून आजचे आधुनिक 'कम्प्युटर सायन्स' त्यावरच आधारित आहे. विज्ञानतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उपयुक्त ठरलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence) संदर्भातही त्यांचे कार्य मोलाचे मानले जाते. त्यामुळे ॲलन ट्युरिंग हे संगणक-युगकर्ता ठरतात.

ट्युरिंग यांचा जन्म लंडनमध्ये २३ जून १९१२ रोजी झाला. त्यांचे वडील ज्युलिअस ट्युरिंग हे ब्रिटिशकालीन भारतात भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी होते. प्रशासकीय सेवेतून १९२६ मध्ये निवृत्त झाल्यानंतर ते ब्रिटनमध्ये परतले. ॲलन यांचा जन्म होण्यापूर्वी त्यांच्या आईचे वास्तव्यही काही काळ भारतात होते. ॲलन ट्युरिंग यांना बालपणापासून विज्ञानाची विशेष आवड होती. त्यांच्यातील विज्ञानविषयक सर्जनशीलतेला चालना मिळण्यासारखे त्यांच्या बालपणी विशेष असे काही घडले नाही. मात्र, 'नॅचरल वंडर्स एव्हरी चाइल्ड शुड नो' या पुस्तकाचा त्यांच्या बालमनावर प्रभाव पडला होता. निसर्गातील सर्वात जास्त परिचयाची असलेली आणि कमीत कमी ऊर्जेचा वापर होईल, अशी वस्तू वापरण्याचे त्यांच्या बालमनातील जणू एक वेडच होते. त्या काळी प्रतिष्ठेच्या मानल्या गेलेल्या 'पब्लिक स्कूल'मध्ये लहानग्या ॲलनला केवळ विज्ञानवेडापायी प्रवेश मिळणार नाही अशी भीती मात्र त्यांच्या आईच्या मनात होती. गंमत म्हणजे ॲलनला विज्ञानशाखेचा विशेष अभ्यास करून त्यात प्राविण्य मिळवायचे असल्यास त्याने 'पब्लिक स्कूल'मध्ये वेळ घालवू नये, असा शेरा कालांतराने त्यांच्या 'पब्लिक स्कूल'मधील मुख्याध्यापकांनीच त्यांचे मूल्यमापन करताना लिहून दिला होता.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांच्या जवळच्या मित्राच्या मृत्युमुळे अस्वस्थ होऊ न माणसाचे मन आणि भौतिक विश्व यांच्यातील संबंधांबाबत ट्युरिंग यांनी बरेच चिंतन केले होते. त्यातून ते भौतिक शास्त्रातील 'क्वांटम् मेकॅनिक्स्'कडे वळले. १९३०च्या दशकात त्यांनी गणितात विशेष प्राविण्य प्राप्त केले. गणितातील probability theory संदर्भात त्यांना विशेष पुरस्कारही मिळाला होता. त्या काळी गणितात 'निर्णयाचा प्रश्न' (Decision problem/Decidability) हा विषय चर्चिला जात होता. याच संदर्भात जर्मन भाषेतील Entscheidungsproblem हा शब्द त्या काळी वापरात होता. त्यामुळे ट्युरिंग यांनी १९३६-३७मध्ये लिहिलेल्या या संदर्भातील संशोधनपर लेखाचे शीर्षक On computable numbers, with an application to Entscheidungsproblem असे होते. कोणतेही एक गणितीय विधान (assertion) एका विशिष्ट पद्धतीने वा प्रक्रियेने सोडवून ते सिद्ध करता येईल का, हा प्रश्न त्या चर्चेत केंद्रस्थानी होता. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी 'पद्धत' म्हणजे नेमके काय आणि ठरावीक पद्धतीने काम केले तर काय होऊ शकते, हे समजून घेण्याची गरज होती. याला Algorithm असे म्हटले जाते. ट्युरिंग यांनी नेमके हेच शोधण्याचे कार्य केले. एखादे यंत्र Algorithm नुसार काम करू शकते, हे त्यांनी गणितीय पद्धतीने मांडून दाखवले. मात्र याच काळात अमेरिकेतील तर्कशास्त्रज्ञ Alonzo Church यांनीदेखील या विषयावर संशोधनपर लेखन केल्याने ट्युरिंग यांना या विषयाचे संपूर्ण श्रेय मिळाले नाही. ट्युरिंग यांना आपल्या लेखात Church यांच्या लेखनाचा संदर्भ द्यावा लागला होता.

माणसाच्या मनात मानसिक क्रिया घडून येत असतात तेव्हा मानसिक पातळीवर होणा-या स्थित्यंतराबाबतही विवेचन करण्याचा प्रयत्न या अभ्यासाच्या वेळी त्यांनी केला. १९५०च्या सुमारास या विषयाचा अधिक विस्तार करू न त्यांनी Computing Machinery and Intelligence हा संशोधनपर लेख लिहिला. कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक संशोधनासाठी हा लेख महत्त्वपूर्ण ठरला. तसेच तत्वज्ञानाच्या अभ्यासातही तो उपयुक्त ठरला. त्यामुळे ॲलन ट्युरिंग यांचा तत्त्वज्ञान हा अभ्यासाचा विषय नसूनही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्यांचे नाव घेतले जाते.



ट्युरिंग यांच्या कार्यामुळे गणिताच्या क्षेत्रात, विशेषतः, computation व computabilityच्या संदर्भात Turing Machine असा उल्लेख सतत करण्यात येऊ लागला. कारण, या संदर्भात ट्युरिंग यांनी प्रत्येक Algorithmसाठी योग्य क्रमाने योग्य सूचनाही मांडून ठेवल्या होत्या. थोड्या वेगळ्या प्रकारे असेही म्हणता येईल की, Turing Machine ही संगणकासाठी जणू एक आज्ञावली (computer programme) बनली. आज संगणक करीत असलेल्या कामाचा विचार केला तर संगणकात अशा अनेकानेक पूर्वनियोजित आज्ञावली साठवलेल्या असतात असे दिसते. ट्युरिंग यांनी मांडलेल्या थिअरीमुळे आजच्या संगणकशास्त्राचा पाया त्यांच्या कार्याद्वारे घातला गेला आहे. म्हणून आजच्या संगणकयुगाच्या कर्तेपणाचा मान त्यांना दिला जातो. दुस-या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशांच्या शत्रूंचे गुप्त संदेश समजून घेण्याचे काम ट्युरिंग यांनी ब्रिटिश सरकारसाठी केले होते. या कामात ते तज्ज्ञ मानले जात होते.

१९४४च्या सुमारास ट्युरिंग स्वतःच इलेक्ट्रॉनिक्स शिकत होते. त्या वेळी त्यांच्या मनात तीन कल्पना आकारत होत्या. Turing Machineची निर्मिती करता येणे शक्य आहे का; इलेक्ट्रॉनिक्सचा वापर, वेग व विश्वासार्हता आणि वेगवेगळ्या तर्कसुष्ट पद्धतींसाठी वेगवेगळी यंत्रे न वापरता एकच यंत्र तयार करता येईल का, या तीन कल्पनांनी त्यांचे विचारविश्व व्यापले होते. इतकेच नव्हे तर, जर Turing Machine तयार करता आले तर त्याला माणसाच्या मेदूप्रमाणे काम करता यायला हवे, असेही त्यांना वाटत होते. त्यांचे सहकारी मित्र Donald Bayley यांच्याबरोबर चर्चा करताना त्यांनी building the brain ही कल्पना मांडलीदेखील होती. १९४६नंतरच्या काळात Automatic Computing Engine (ACE) तयार करण्याची प्रक्रिया चालू झाली तरी त्याबाबत फारशी प्रगती झाली नाही. दरम्यान, काही विद्यापीठे व संशोधनसंस्थाही यात रस घेत होत्या. या काळात ट्युरिंग यांनी शिक्षणाच्या क्षेत्रातही काम केले. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू म्हणजे ते उत्तम धावपटूही होते. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांची निवड थोडक्यात हुकली. १९५२मध्ये ट्युरिंग यांचे आकस्मिक निधन झाले. पण त्यांच्या कार्यामुळेच आजचे संगणकयुग सिद्ध झाले आहे. ■■

## लोकशाही व्यवस्था - १

# लोकसहभाग व लोकशाही व्यवस्थेसमोरील आव्हाने

**- प्रा. सुहास पळशीकर**

लोकशाही हा विषय आज आपल्या देशात चर्चेचा बनला आहे. लोकपालविषयक चर्चा आणि अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन यांमुळे हा विषय अनेकांसाठी उत्कंठेचा ठरला आहे. हे आंदोलन केवळ भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे असे नाही तर, लोकशाहीविषयक अन्य काही मुद्देही या आंदोलनाने पुढे आणले आहेत. लोकशाहीविषयक सखोल व गंभीर चर्चा या निमित्ताने घडून येते आहे आणि हे लोकशाहीच्या जिवंतपणाचेच लक्षण मानले पाहिजे. लोकशाहीविषयक चर्चा अधिक सकस व्हावी या उद्दिष्टाने आयोजण्यात आलेल्या या विचारमंथनात या आंदोलनासंदर्भातील पार्श्वभूमी समजून घेणे गरजेचे ठरते. भारतात आज लोकशाहीव्यवस्थेबाबत एक साचलेपण आलेले दिसते. संपूर्णपणे अपयशी ठरलेले विरोधी पक्ष याचे एक मुख्य कारण आहेत. लोकशाहीत विरोधी पक्षांनी जागरु क राहून सरकारला विविध मुद्द्यांवर विचार करायला भाग पाडले पाहिजे. पण तसे घडताना दिसत नाही. ही आजची स्थिती नाही तर २००४पासून विरोधी पक्ष जणू अस्तित्वात नाहीत असे चित्र निर्माण झाले. विरोधी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष इथे अपेक्षित आहे. दुसरीकडे भ्रष्टाचार वाढत असूनही सरकार काहीच करत नाही असा एक साधार संशय लोकांच्या मनात आहे. त्यामुळे राजकीय व्यवस्थेविषयी एक साशंकता व नाराजी लोकांच्या मनात निर्माण झाल्याचे चित्र आज दिसते.

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे १२ व १३ डिसेंबर २०११ रोजी 'लोकसहभाग आणि लोकशाही' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी 'लोकसहभाग आणि लोकशाही व्यवस्थेसमोरील आव्हाने' या विषयावर प्रा. सुहास पळशीकर यांचे भाषण प्रथम झाले. प्रा.पळशीकर हे संस्थेच्या नियंत्रण मंडळाचे सदस्य असून राज्यशास्त्राचे ज्येष्ठ आणि व्यासंगी अभ्यासक-अध्यापक-विश्लेषक आहेत. 'लोकसहभाग, लोकशाही व्यवस्था आणि माध्यमे' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार व माध्यमविश्वाचे प्रगल्भ जाणकार आनंद आगाशे यांचे भाषण दुस-या दिवशी झाले. या भाषणांचा गोषवारा पुढील दोन लेखात देत आहोत. - संपादक*



याच संदर्भात भारतातील सामाजिक परिस्थितीचा - स्थित्यंतराचा - विचार केला पाहिजे. गेल्या काही वर्षांत येथील मध्यमवर्गाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. त्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढल्या. भारतात मध्यमवर्ग पूर्वीपासून असला तरी स्वातंत्र्यानंतरचा मध्यमवर्ग सरकारसमर्थक वा सरकारवर टीका करणारा होता. त्याला राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हत्या. आताच्या मध्यमवर्गाला आपण लोकशाही व्यवस्थेचे घटक असून राजकीय धोरणात आपला सहभाग असावा असे वाटते. त्यामुळे अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला या मध्यमवर्गाचा पाठिंबा मोठ्या प्रमाणावर मिळाला. दुसरी बाजू म्हणजे, या मध्यमवर्गात शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा तसेच सर्व जातीजमातींचा समावेश आहे. बदललेल्या अर्थव्यवस्थेकडून अपेक्षाभंग झालेल्या कनिष्ठ मध्यमवर्गाचाही पाठिंबा या आंदोलनाला मिळाला. त्यामुळे आंदोलनाचे चालकत्व एका अर्थाने राजकीय महत्त्वाकांक्षा वाढलेल्या मध्यमवर्गाच्या आणि अपेक्षाभंग झालेल्या मध्यमवर्गाच्या हाती आहे.

अर्थात या दोन गटांनी चर्चा करून असे आंदोलन घडवून आणले असा या विवेचनाचा अर्थ नाही. मात्र, आंदोलनाच्या निमित्ताने या दोन गटांच्या संवेदना एकत्र आल्या असे दिसते. गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवांमुळे या दोन्ही गटांना राजकारणाबाबत संशय व राग असावा असे दिसते. राजकारण वाईट असे मानून भ्रष्टाचाराला व राजकारणाला विटलेल्या या गटाची भूमिका राजकारण नसलेली लोकशाही (कदाचित पक्षविरहित?) असावी, अशी काहीशी बनत जाते. आणखी एका मुद्याचा विचार इथे करणे क्रमप्राप्त आहे. तो म्हणजे या काळात माध्यमांची व्याप्ती व ताकद वाढली. यात इलेक्ट्रॉनिक माध्यमे व इंटरनेट अशी सर्व माध्यमे आली. माध्यमांचे अर्थकारण आणि माध्यमांना करायचे असलेले राजकीय हस्तक्षेप यांचाही विचार या संदर्भात केला पाहिजे.

आणखी एक गोष्ट इथे लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे अरब जगतात झालेल्या क्रांतीचा संदर्भ या आंदोलनाशी जोडला जातो. पण लोकशाही नसलेल्या देशांमध्ये लोकशाहीची स्थापना करण्यासाठी होणारी क्रांती/उठाव आणि लोकशाही असलेल्या देशांमध्ये अस्तित्वात असलेली लोकशाही बळकट होण्यासाठी केलेले प्रयत्न वा आंदोलन यांत मूलभूत फरक आहे. त्यामुळे ही तुलना होऊ शकत नाही, हे नोंदवणे गरजेचे आहे. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची तुलना जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाशीही करण्याचा प्रयत्न झाला. पण जयप्रकाशजींचे आंदोलन एका पक्षाविरुद्ध होते. तर अण्णा हजारे यांचे आंदोलन एका पक्षाविरुद्ध नाही हा महत्त्वाचा फरक आहे. अलीकडे काही राजकीय पक्ष हे या आंदोलनाच्या व्यासपीठावर जाऊन भ्रष्टाचाराच्या विरोधात आपली भूमिका मांडत आहेत. यात राजकीय पक्षांचा आत्मपरीक्षणाचा सूर दिसून येतो. लोकशाहीच्या दृष्टीने ही चांगली बाब आहे.

भारतात आता खरीखुरी लोकशाही आणायची आहे आणि त्यात अडचण ही राजकारणाची आहे, असे चित्र या आंदोलनकर्त्यांनी निर्माण केले. लोकशाही आणि राजकारण यांच्यात द्वैत आहे, हाही मुद्दा या वेळी मांडण्याचा प्रयत्न झाला. सत्प्रवृत्त नेता आणि सरकारी नोकरी सोडून आलेले अधिकारी यांनी हे आंदोलन घडवून आणल्याने सर्वसामान्य नागरिकांचा त्याला मोठा पाठिंबा मिळाला. दुसरीकडे, हे आंदोलन हाताळताना सरकारने प्रत्येक टप्प्यावर चुका केल्या, हेही नोंदवले पाहिजे. पण त्याचबरोबर केवळ अशा आंदोलनांनी भ्रष्टाचारावर काबू मिळवणे शक्य होत नाही, हेही लक्षात ठेवले पाहिजे. तरी भ्रष्टाचाराचा प्रतिकार करण्यासाठी संस्थात्मक पातळीवर काय केले पाहिजे, अशांसारख्या मुद्द्यांवर सर्व जण गंभीरपणे विचार करू लागले. त्यामुळे तशा व्यवस्था निर्माण करण्याला प्राधान्य मिळते. लोकपाल विधेयकामागील प्रेरणा ही युरोपीय देशांमधील Ombudsman या संस्थेवर आधारित आहे. आपल्या देशातील सर्व प्रकारची परिस्थिती लक्षात घेऊन देशाच्या गरजेनुसार या व्यवस्थेचे स्वरूप आखण्यात आलेले नाही. तरीदेखील पंतप्रधान व न्यायाधीश हे लोकपालाच्या कक्षेत असावेत किंवा कसे असे महत्त्वाचे मुद्दे या निमित्ताने चर्चेत आहेत.



लष्करी अधिकारीदेखील लोकपालाच्या कक्षेत यावे असा मुद्दा मात्र अद्याप उपस्थित झालेला नाही. कॉर्पोरेट व माध्यमे यांचे काय असे प्रश्नही उपस्थित झाले पाहिजे. सर्व पातळ्यांवरील भ्रष्टाचार कसा कमी होईल हा विचार व्हायला हवा. कारण भ्रष्टाचाराची एक मोठी साखळी असते. अनेकांचे अनेक ठिकाणी साटेलोटे असते, ही वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. त्यामुळे एका अर्थाने ही चर्चा अपुरी आहे. समाज म्हणून अशा अनेक विषयांवर सर्वंकष चर्चा व्हायला हवी. संस्थात्मक प्रतिसाद त्यानंतर देणे योग्य ठरेल. या संदर्भातील दुसरा मुद्दा म्हणजे जनलोकपालाचा. सत्प्रवृत्त नागरिकांपैकी एका सन्मान्य नागरिकाकडे लोकपालाची जबाबदारी सोपविता येईल, असे म्हटले गेले. पण जनलोकपालावर कोणी लक्ष ठेवायचे या प्रश्नाचे उत्तर नाही. मुळात समाज काही सत्प्रवृत्त व काही दुष्प्रवृत्त नागरिकांमध्ये विभागला गेला आहे, असे समजून राजकीय व्यवस्थेला कृती करता येत नाही. त्यापेक्षा दुष्प्रवृत्त लोकांना रोखण्यासाठी संस्थात्मक पातळीवर काय करता येईल याचा विचार करणे अगत्याचे ठरते. न्यायालये राजकारणापासून अलिप्त असली तरी न्याययंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यात न्यायव्यवस्था अपयशी झालेली आहे, असे काही न्यायाधीशांनीच म्हटले होते, हे ध्यानात घेतले पाहिजे. जनलोकपालाची चर्चा इथे येऊन थांबते. भ्रष्टाचाराचा मुद्दा खेडोपाडी पोहचून लढा उभा राहात नाही तोपर्यंत आंदोलन सर्व पातळ्यांवर पोहचणार नाही, असेही म्हणणे उचित ठरावे.

आता भ्रष्टाचाराचा मुद्दा सोडून आंदोलनकर्त्यांच्या राजकारण-विरोधाचा विचार करू. राजकारणामुळे भ्रष्टाचार होतो म्हणून राजकीय व्यवस्थेत हस्तक्षेप करून येथील राजकीय व्यवस्थांमध्ये बदल/सुधारणा करण्याचे आग्रही प्रतिपादन अशा वेळी केले जाते. त्याकडे वळण्याआधी तीन मुद्दे महत्त्वाचे ठरतात. पहिला मुद्दा कार्यपद्धतीविषयक आहे. भारताने उदारमतवादी भूमिका स्वीकारून संविधान व कायद्याचे राज्य मान्य केले आहे. प्रशासकीय व संस्थात्मक रचना उभ्या करून अनेकविध प्रकारच्या कार्यपद्धतींचे जाळे इथे उभे राहिले आहे. पण कार्यपद्धतीमधील वेळखाऊ-पणा व किचकटपणा यांमुळे काही प्रश्न निर्माण होऊन नागरिक त्रस्त होतात. कार्यपद्धतींविषयीची एक नापसंती यातून मनांत निर्माण होते.

पण त्यामुळे अस्वस्थ न होता लोकशाहीतील निर्णयप्रक्रिया ही वेळखाऊ असणारच हे मान्य केले पाहिजे. त्याचवेळी कार्यपद्धतींमुळे होणारा विलंब म्हणजे लोकशाहीसाठी मोजलेली एक किंमत असते, हेही लक्षात घेतले पाहिजे. पण ते लक्षात घेतले जात नाही. मग 'आम्ही म्हणतो तसे' अशी एक 'झुंडवादी लोकशाही'ची मानसिकता/कल्पना आपल्या देशातील लोकांच्या मनांत रुजते आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

राजकीय व्यवस्थांमध्ये बदल घडवून आणण्याच्या चर्चेत भारताने स्वीकारलेल्या प्रातिनिधिक लोकशाहीबाबत प्रश्न निर्माण केले जातात हा दुसरा मुद्दा आहे. लोकांनीच त्यांच्या प्रतिनिधीला निवडून दिलेले असते. आपल्याला निवडून देणा-या जनसामान्यांच्या अपेक्षा ध्यानात घेऊन प्रतिनिधीने निर्णय घेणे अपेक्षित असते. पण अनेकदा असे दिसते की लोकप्रतिनिधी बेजबाबदारपणे वागतात. निवडून आलेले प्रतिनिधी चांगल्या पद्धतीने कार्य करतील याची शाश्वती लोकांना वाटत नाही. त्यामुळे हा मुद्दा उपस्थित होतो. प्रातिनिधिक लोकशाही प्रणाली आपल्या देशात गेली ६५-६६वर्षे नांदते आहे. त्याच वेळी, आपल्या देशातील अर्थवास्तव भांडवलशाहीप्रधान आहे, हेही नाकारता येत नाही. त्यामुळे, संघटित भांडवलशहा आणि ताकदवान कॉर्पोरेट विश्व यांचा प्रभाव आर्थिक धोरणनिर्मितीवर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे पडतोच, हे वास्तव आपल्याला स्वीकारले पाहिजे. पण या तीन मुद्यांचा नीट विचार केला तर आंदोलनकर्त्यांना एकूण भारतीय लोकशाहीची पुनर्घटना/पुनर्रचना इथे अपेक्षित आहे असे दिसते. ही चर्चा खरे तर महत्त्वाची आहे. ही पुनर्घटना का करायची या मागील भूमिका/कारणे दिली जातात.

राजकीय पक्ष अयशस्वी ठरले, पक्षांतर्गत लोकशाही नाही, आपली संसद व विधिमंडळे पुरेशी परिणामकारक राहिलेली नाहीत इत्यादी अनेक बाबींचा या कारणांमध्ये उल्लेख होतो. पक्षांतर्गत लोकशाही नाही असे, राजकीय पक्षांबाहेर असणा-यांनी (आंदोलनकर्त्यांनी) म्हणणे हे कितपत योग्य ठरते हा प्रश्न असला तरी पक्षांतर्गत लोकशाही ही पुरेशा प्रमाणात नाही, हेही खरे आहे. तसेच राजकीय पक्ष ख-या अर्थाने राजकारण करीत नाहीत. ते केवळ सत्तेचे राजकारण करतात, असे नोंदवून ठेवता येईल.



ख-या अर्थाने राजकारण करणे म्हणजे परस्परांशी स्पर्धा करणा-या वेगवेगळ्या गटांमध्ये हितसंबंधांचा समन्वय साधणे व त्या राजकारणासाठी भूमिका घेऊन विचार व कृती करणे होय. ही भूमिका आज राजकीय पक्ष घेताना दिसत नाहीत. पडेल तसे काम करणे व येईल ती भूमिका घेणे असे काम ते बजावतात व त्यामुळे एकूणच राजकीय पक्षांचा कामकाजाचा दर्जा कमी होतो. राजकीय पक्षांना लागणारा पैसा हा आणखी एक चर्चेचा मुद्दा ठरतो. पण राजकीय पक्षांना पक्ष चालवायला, निवडणुका लढवायला पैसा लागणारच. तो कसा उभा करायचा, त्यात पारदर्शकता कशी असावी याची चर्चा व्हायला हवी.

एकूण राजकीय सुधारणा म्हणून जे तीन मुद्दे सुचविले जातात त्याचा आता विचार करू 'राइट टू रिजेक्ट' (उमेदवार नाकारण्याचा अधिकार), 'राइट टू रिकॉल' (प्रतिनिधीला माघारी बोलविण्याचा अधिकार) आणि लोकांनी विधेयक प्रस्तावित करण्याचा अधिकार हे तीन मुद्दे सध्या चर्चेत आहेत. त्यांपैकी 'राइट टू रिजेक्ट' आता काही प्रमाणात आहे व तो अधिक सुकर व्हावा असे म्हटले गेले आहे. 'राइट टू रिजेक्ट' याच्या खोलात न जाता एकच महत्त्वाचा मुद्दा इथे मांडला पाहिजे. तो असा की आपल्या लोकशाहीपद्धतीत उपलब्ध पर्यायांमधून एक पर्याय स्वीकारण्यास आपण मान्यता दिली आहे. म्हणजे, आहे त्या शक्यतांमधून एक शक्यता स्वीकारणे हे मान्य झाले आहे. आता हाही उपलब्ध पर्याय नाकारला तर उमेदवार कसे निवडून येणार, लोकशाही कशी चालणार हे प्रश्न उपस्थित होतात. शिवाय, नागरिक पक्षाला नाकारत आहेत की उमेदवाराला अशी गुंतागुंत निर्माण होऊ शकते. भारतीय लोकशाही ही 'प्रतिनिधी' आणि 'राजकीय पक्ष' या दोघांच्याही मिश्रणातून चालणारी व्यवस्था आहे, हे इथे समजून घेतले पाहिजे. निवडणुकीत मतदान करताना कधी पक्ष महत्त्वाचा असतो तर कधी उमेदवार. पण हे ज्याने त्याने ठरवायचे असते. कुणाचे चूक वा बरोबर हा मुद्दा नसून लोकशाही पद्धतीने बहुमताने कोणीतरी जिंकून येऊन व्यवस्था पुढे चालणे हे गरजेचे असते. त्यामुळे 'राइट टू रिजेक्ट' मान्य करून आपण लोकशाही अशक्यतेच्या पर्यायाकडे ढकलतो आहे का, याचा नीट विचार व्हायला हवा.

'राइट  टू रिकॉल'चे व्यावहारिक मुद्दे खरे तर नीट मांडण्यात आलेलेच नाहीत. त्यामुळे त्याचा विचार तूर्तास बाजूला ठेवू. पण 'राइट  टू रिकॉल'मागील भूमिका लक्षात घेतली पाहिजे. हा आमचा प्रतिनिधी नाही तर तो आमचा 'डेलिगेट' आहे, अशी भूमिका यातून पुढे आली आहे. या प्रतिनिधीने पक्षनेत्याला नव्हे तर नागरिकांना विचारले पाहिजे, अशी अपेक्षा याद्वारे व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजे, या प्रतिनिधीने एका प्रकारे 'दूता'ची भूमिका बजावावी असे सूचित करण्यात आले आहे. अमूक एका प्रकारच्या सूचना (brief) दूताला दिलेल्या असतात. त्याच्या पलीकडचा मुद्दा उपस्थित झाला तर त्याने परत येऊन आपल्या मतदारांना विचारावे, असे यात अपेक्षित आहे. म्हणजे, आपण स्वीकारलेल्या प्रातिनिधिक लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणारी ही भूमिका आहे. ही भूमिका स्वीकारायची असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे, हा आणखी सखोल अभ्यासाचा भाग आहे. पण आहे त्या परिस्थितीत 'राइट टू रिकॉल' आणल्याने काही सुधारणा होतील हा भ्रम निर्माण केला जातो आहे. ही संसदीय रचनाच नको आहे आणि नवीन रचना निर्माण करायची आहे त्याचा हा आराखडा, असे म्हणून संपूर्ण चर्चा करणे ही बाब वेगळी आहे, हे लक्षात घेणे इथे आवश्यक ठरते.

तिसरा भाग आहे तो जनप्रस्तावित कायद्याचा. जनलोकपाल हे त्याचेच उदाहरण. सरकारबरोबर विधेयकाबाबत चर्चा करण्यास भारतात बंदी नाही. समजा सरकारकडे एक प्रस्ताव आहे, दुस-या गटाकडे आणखी एक प्रस्ताव आहे, तर चर्चा करून एक अंतिम प्रस्ताव तयार करणे यात अवघड वा चुकीचे काहीच नाही. पहिल्याच टप्प्यात संबंधित सर्वांनाच चर्चा करून यावर मार्ग शोधता आला असता. पण सरकारने सुरुवातीपासून या आंदोलनाला प्रतिसाद देण्यात चुका केल्याने असे घडले. आता जनप्रस्तावित विधेयक कोण मांडणार? नागरिकांच्या सशक्त संघटना असे विधेयक मांडण्यात सहभागी होऊ  शकतात. उदाहरणार्थ, विशिष्ट विषयांशी संबंधित असलेल्या FICCI सारख्या (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री) संस्था अशा चर्चा करण्याचे कार्य करत असतातच. मग या आंदोलनकर्त्यांनी अशी मागणी का केली असावी?



कदाचित अशी तरतुद संविधानात करावी, असे काही त्यांना सुचवायचे असावे. पण, इथे व्यावहारिक बाजू लक्षात घेणे गरजेचे असते. मुळात संस्था/रचना निर्माण करणे आणि त्या चालविणे यात मोठे अंतर आहे आणि ते कसे कमी करायचे हा इथे चर्चेचा व चिंतनाचा मुद्दा ठरतो. म्हणजे, अशा यंत्रणा निर्माण करून भागत नाही तर त्या यंत्रणा यशस्वीपणे राबविण्याचे कौशल्यही विकसित करावे लागते.

लोकसहभाग वाढला तर लोकशाही अधिक सशक्त बनेल असे मानले जाते. लोकसहभागासंदर्भात इथे एक लक्षात घेतले पाहिजे की राजकीयदृष्ट्या काही किमान (politically minimum) लोकसहभागाची तरतूद आपल्या व्यवस्थेत मतदानाचा अधिकाराच्या रूपाने करण्यात आलेली आहेच. पण यापेक्षा अधिक काही संस्थात्मक वा संविधानाद्वारे तरतुदी केल्या तर ज्यांना आधीपासून आवाज आहे म्हणजे जे सर्व अर्थांनी (शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थिती चांगली असणारे) सशक्त आहेत असेच समाजघटक हा पर्याय अधिक प्रमाणात वापरू  शकतील. हाच नेमका पेचप्रसंग आहे. कारण हा वाढणारा आवाज मध्यमवर्गाचा असेल हे उघडच आहे. मध्यमवर्गाचा आवाज वाढणे यात आक्षेप घेण्यासारखे काही नाही. पण एक राजकीय असमानता (political asymmetry) आपण मान्य करतो आहोत असे यातून दिसते. अर्थात, राजकीय असमानता आजही आहे. पण घटनेद्वारे वा संस्थात्मक रचना निर्माण करून आपण तिला जाणीवपूर्वक अधिमान्यता देतो आहोत का हा, प्रश्न विचारला पाहिजे.

स्वप्नाळू पद्धतीने प्रयत्न करून लोकशाहीच्या नावाखाली राजकीय असमानता वाढविण्यापेक्षा लोकसहभाग वाढविण्यासाठी अन्य काही प्रयत्न करता येतील. ७३व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभेला बरेच अधिकार दिलेले आहेत, त्याबाबत बरेच काही करता येईल. २०११मधील या आंदोलनाने अनेक प्रश्न पुढे आणले, अनेक मुद्यांवर विचार करायला भाग पाडले, हे खरे. पण यामुळे असे एक चित्र निर्माण झाले आहे की भारतातील लोकशाहीची आशयघनता वाढते आहे. आशयविस्तार होतो आहे. पण लोकसहभाग वाढण्याचा हा 'मायावी लोकशाही'चा क्षण आहे की खरोखरच आशयघनता वाढते आहे, हा एक मोठा प्रश्न सध्या उद्‌भवला आहे. ■■

लोकशाही व्यवस्था - २

# लोकसहभाग, लोकशाही व्यवस्था आणि माध्यमे

**- आनंद आगाशे**

कायदेमंडळ, प्रशासन, न्यायपालिका आणि माध्यमे या लोकशाहीच्या चार स्तंभांभोवतीची गूढतेची वलये दूर होण्याचा (Dy-mystification) आजचा काळ आहे. लोकशाहीचे आधारस्तंभ असल्याकारणाने हे स्तंभ आजपर्यंत 'अति पवित्र' मानले गेले. साहजिकच हे चारही स्तंभ नेमके कसे काम करतात यांबाबत सर्वसामान्यांना फारसे समजू शकले नाही. पण गेल्या काही वर्षांपासून व विशेषतः, अलीकडच्या वर्ष-दोन वर्षांतील विविध घडामोडींमुळे हे चारही स्तंभ चर्चेत आहेत आणि त्यांचे अंतरंग लोकांपर्यंत पोहचू लागले आहे. हा बदल लोकशाहीसाठी स्वागतार्ह आहे.

या चारही स्तंभांच्या संदर्भात काही बाबींची पुरेशी स्पष्टता नाही. विधिमंडळाच्या संदर्भात हक्कभंग हा एक अडचणीचा मुद्दा ठरतो. वार्तांकन करताना याचे फार भान ठेवावे लागते. न्यायपालिकेच्या संदर्भात न्यायालयाचा अवमान (Contempt of Court) हा मुद्दा असतो. संपादकांसाठी हा महत्त्वाचा अडसर असतो, कारण टीका-टिप्पणी करण्याचे काम संपादकांचे असते. प्रशासनाचे कामकाज म्हणजे कोणत्या फाईलमध्ये काय दडले आहे, कोणते निर्णय का, कसे आणि किती वेगाने घेतले गेले, कोणते निर्णय दडपले गेले हे तर या आधी कधीच समजून येत नव्हते. पण माहितीचा अधिकार आल्याने पूर्वीच्या तुलनेत काही माहिती मिळणे नक्कीच सोपे झाले आहे. याचा अर्थ विविध पातळ्यांवरील गैरव्यवहार वा भ्रष्टाचार कमी झाला असे नाही. पण नागरिकांच्या हाती माहिती मिळविण्याचे साधन उपलब्ध झाले, ही मोठी जमेची बाजू म्हटली पाहिजे. न्यायपालिकेच्या कामकाजाच्या संदर्भात Judicial Accountability Bill चर्चेत असून त्याचाही उपयोग नागरिकांना होईल, अशी आशा आहे.



आता प्रश्न आहे तो माध्यमांचा. माध्यमांचे वैशिष्ट्य असे की माध्यमे ही खाजगी क्षेत्रात आहेत, ती सरकारी यंत्रणेचा भाग नाहीत. तिथे माहितीचा अधिकार लागू होत नाही. माध्यमांनी स्थापन केलेली 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'सारखी यंत्रणा असली तरी ती प्रभावी नाही. माध्यमे खाजगी क्षेत्रात असल्यामुळे सरकारने त्याबाबत काही केलेले नाही. कोणत्याही सरकारने असा विचार जरी बोलून दाखवला तरी त्यावर टीकेचे मोहोळ उठते, असा अनुभव आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही सुयोग्य यंत्रणेअभावी माध्यमे ही त्यांच्या कामकाजात किमान पारदर्शकता येण्यापासून दूरच राहतात. गेल्या काही वर्षांपासून माध्यमे ही त्यांच्याच कर्तृत्वामुळे/ वर्तणुकीमुळे चर्चेत आहेत. विशेषतः, 'पेड न्यूज'ची चर्चा तर फारच गाजली. माध्यमे काही बातम्या वा काही विषय ज्या प्रकारे हाताळतात त्यामुळेही ती स्वतःच चर्चेचा विषय बनतात. या चर्चेचा परिपाक म्हणून माध्यमांबाबत नियंत्रण करणारी काही यंत्रणा असू शकेल का किंवा योग्य कृती करण्यासाठी माध्यमे स्वतःहून तशी बंधने स्वतःवर लागू करतील का, हे प्रश्न सध्या अनुत्तरित आहेत. मात्र, सुदैवाने माध्यमांच्या संदर्भातही Dy-mystificationची प्रक्रिया अलीकडे चालू झालेली आहे.

'पाचवा स्तंभ' म्हणून अलीकडे निर्देशित केली जाणारी आणि लोकशाहीत महत्त्वाची असलेली नागरिकशक्ती वा नागरिकांचे समूह गेल्या काही वर्षांत आपले म्हणणे मांडू लागले आहेत. शहरी व निमशहरी भागांचा विचार करायचा तर मध्यमवर्ग आता अधिक प्रमाणात बोलू लागला आहे. यामागे कदाचित त्याच्या वाढलेल्या राजकीय आशा-आकांक्षा हे कारण असेलही, पण तेवढे विश्लेषण पुरेसे नाही. जो वर्ग आज आवाज उठवू पाहतो आहे, ज्याच्या हाती आवाज व्यक्त करण्याची संधी आहे तो मध्यमवर्ग असेलही. पण ग्रामीण भागांतील नागरिकही मिळेल त्या साधनांद्वारे आपले म्हणणे सत्ताधा-यांपर्यंत पोहचवू लागला आहे, हेही इथे लक्षात घेणे गरजेचे आहे. म्हणजे, वरील चारही स्तंभांपेक्षा वेगळे काही म्हणणे असलेली नागरिकशक्ती उदयास येते आहे, असे स्पष्टपणे आढळते. याची काही कारणे आहेत. राजकीय नेते किती भ्रष्ट आहेत याची चर्चा होत असते, प्रशासनाबाबतही असेच घडते.

कोर्टाची पायरी चढू नये, असे पूर्वीपासून म्हटले जात होतेच, ते आजही खरे आहे. आता माध्यमांबाबतही नाराजीचा सूर उमटतो आहे. माध्यमांमध्ये आपल्याला पुरेशी जागा मिळत नाही, असे अनेकांना वाटू लागले आहे. अशा परिस्थितीत, लोकशाहीच्या चारही स्तंभांमधून आपल्याला दाद मिळत नसेल तर करायचे तरी काय, असा प्रश्न नागरिकांच्या मनांत उपस्थित होणे स्वाभाविक आहे. यामुळे आज (कदाचित चाचपडत असलेला) 'पाचवा स्तंभ' आकाराला येतो आहे, असे निश्चितपणे दिसते.

वृत्तपत्रांमधून जाहिराती देण्यापासून रस्त्यांवरच्या फ्लेक्सपर्यंतचे मार्ग हे समूह अवलंबतात. फ्लेक्सचा वापर भविष्यात वाढण्याची शक्यता आहे, कारण ते सध्या सर्वांत स्वस्त माध्यम आहे ! फ्लेक्स हे एकाप्रकारे ध्वनिवर्धकाचे काम करतात, हे समजून घेतले तर त्यांच्या लोकप्रियतेचे कारण लक्षात येईल.

दुसरी बाब अशी की, आज अनेकानेक चळवळी लुप्त होऊ लागल्या आहेत, असे दिसते. कामगार चळवळ, विद्यार्थी चळवळ, स्त्री मुक्ती चळवळ किंवा जाती निर्मूलनाची चळवळ असेल अशा अनेक चळवळी काही ना काही कारणाने मागे पडल्या आहेत. तिसरा मुद्दा तंत्रज्ञानाचा आहे. गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञानाचा मोठा विकास झाला आहे व होतो आहे . वृत्तपत्रांचाच खप वाढतो आहे असे नाही तर दूरचित्रवाणी आणि नभोवाणीचीदेखील अनेक नवी चॅनेल्स चालू होत आहेत. इंटरनेटसारख्या माध्यमाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. लोकांच्या हाती तंत्रज्ञान/माध्यमे आल्याने त्यांना मोठ्या प्रमाणावर माहिती उपलब्ध होऊ लागली. तंत्रज्ञानाच्या घोडदौडीमुळे असे घडते आहे.

चौथा मुद्दा आहे तो जुनी माध्यमे आणि नवीन माध्यमे यांच्याबाबतचा. जुनी माध्यमे म्हणजे वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके आणि दूरचित्रवाणी व आकाशवाणी इत्यादी, तर नवीन माध्यमे म्हणजे इंटरनेट आणि इंटरनेटची विविध उपांगे. तेव्हा याप्रमाणे माध्यमांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालाच, शिवाय, आधी नमूद केलेल्या कारणांची जोड त्याला मिळाली. या सगळ्याचा एकत्र परिणाम म्हणून सर्वसामान्य नागरिकांचा 'पाचवा स्तंभ' उदयास येतो आहे, असे म्हणता येईल.



ही पार्श्वभूमी असताना सरकारमधील काही उच्चपदस्थांवर अश्लाघ्य टीका करणारा मजकूर इंटरनेटवरून पसरला. मग, केंद्रीय मंत्रिमंडळात असलेल्या कपिल सिब्बल यांनी याहू, गूगल यासारख्या कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलावून हा मजकूर काढून टाकण्याची व पुन्हा असे न घडू देण्याची सूचना केली (खरे तर ब-या बोलाने कृती करणार की सरकारने मजकुरावर नियंत्रण आणण्याचे अन्य मार्ग अवलंबायचे, अशा प्रकारची दमदाटी केली) यावरून बराच गदारोळ उठला. ही एक घाईघाईने दिलेली अविचारी प्रतिक्रिया होती. त्याचप्रमाणे तो सिब्बल यांच्या पिढीचा दोष असावा असेही म्हणता येईल. वस्तुस्थिती अशी आहे की सरकार सध्या भांबावलेले आहे, विविध घोटाळ्यांनी त्रस्त आहे. त्यात अण्णा हजारे यांचे आंदोलनही सरकारला कृती करण्यास भाग पाडते आहे. नेमक्या याच वेळी सरकारला झोडपणा-या, प्रचंड टीका करणा-या माहितीचा महापूर जणू इंटरनेटवर लोटला. त्यामुळे गडबडलेल्या सिब्बल यांची प्रतिक्रिया घाईघाईने दिलेली होती. तरी त्याच वेळी याच पक्षाचे तरुण नेते राहुल गांधी हे गूगलचा उपयोग करून काँग्रेसच्या युवा पिढीबरोबर चोवीस तास कशा प्रकारे चर्चेत राहता येईल याबाबत गूगलशी चर्चा करीत होते. म्हणजे, नवमाध्यमाकडे बघण्याचा एकाच पक्षातील दोन पिढ्यांचा दृष्टिकोण कसा वेगवेगळा आहे, हे यातून दिसून आले.

दुसरे असे झाले की सरकार माध्यमांवर खरोखरच नियंत्रण आणेल अशी हाकाटी चालू झाली. त्याला पार्श्वभूमी होती आणिबाणीच्या काळाची. सरकार कोणतेही असले तरी माध्यमे आपल्या नियंत्रणात असावी असे सरकारला वाटत असतेच. पण १९७५चा काळ आणि २०११चा काळ यात माध्यमांच्याबाबतीत प्रचंड बदल झालेला आहे. पूर्वी माहिती वा बातम्या देणा-या काही विशिष्टच संस्था, वृत्तपत्रे होती. त्यांच्यावर नियंत्रण आणले की सर्वसामान्यांपर्यंत बातम्या पोहचणे शक्य होत नसे. एक तोटी किंवा काही तोट्या बंद करण्याचा तो काळ होता. त्यामुळे बंधने घालणे शक्य होते. आता इंटरनेटच्या प्रसारामुळे असंख्य तोट्या आहेत. कोणकोणत्या तोट्या बंद करणार? शिवाय, इंटरनेटवरील तोट्या दृश्य स्वरूपात नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर बंधने तरी कशी घालणार ?

निव्वळ बातमी वा वृत्त देण्याची जुन्या माध्यमांची ‘गेटकीपर’ची भूमिका आता संपलेली आहे, असे दिसते. त्याच्या जोडीला इंटरनेटवर रोज लाखो पानांचा मजकूर घातला जात असतो. कोणकोणता मजकूर तपासणार आणि त्यावर नियंत्रण तरी कसे ठेवणार, हा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाही स्थिरावलेल्या व अभिव्यक्तिस्वातंत्र्याला मानणा-या आपल्यासारख्या देशात असा मजकूर रोखणे अशक्य आहे किंवा अतिशय कठीण आहे हे समजून घेतले पाहिजे. आणखी एक बाब आहे. देशांतर्गत उगम असलेल्या विशिष्ट मजकुरावर वा वेबसाइटवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न तरी करता येईल. पण ज्या वेबसाइट अन्य देशांत तयार केल्या जातात वा जी माहिती अन्य देशांमधील वेबसाइटवरून उपलब्ध होते ती कशी रोखणार? इंटरनेटवरील मजकुरावर नियंत्रण घालण्याचा इरादा व्यक्त करताना असे अनेक बारकावे सरकारने समजून न घेतल्याने सरकार अडचणीत आले.

नवमाध्यमांमुळे अमेरिका, युरोप व अन्य काही देशांत मुद्रित माध्यमांचा खप व प्रसार कमी होतो आहे असे दिसते. भारतात मात्र तशी परिस्थिती नाही. भारतात जुनी माध्यमे व नवी माध्यमे एकाच वेळी अस्तित्वात आहेत व नजिकच्या भविष्यात तरी ही परिस्थिती अशीच राहील. भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. आता साक्षरतेचे प्रमाण वाढते आहे, त्यामुळे वृत्तपत्रांचा वाचक वाढणारच आहे. दुसरीकडे इंटरनेटचा वापरही वाढत जाईल. त्यामुळे माध्यमांचे विश्व सतत विस्तारते आहे, असे चित्र भारतात असेल.

लोकसहभागाचा विचार करताना माध्यमांच्या बाबतीत ‘स्केल’चा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. भारतात विविध भाषांत प्रसिद्ध होणारी व नोंदणीकृत अशी सुमारे ७४ हजार एवढी वृत्तपत्रे व मासिके आहेत. विविध भाषांमध्ये रोज प्रसिद्ध होणारी सुमारे २७०० दैनिके आहेत तर संपूर्ण देशभरात वृत्तपत्रांच्या सुमारे ११ कोटी प्रती रोज विकली जातात. एका घरात एक वृत्तपत्र पोहचते आणि ते वृत्तपत्र पाच/सहा जण वाचतात असे गृहित धरले तर, सुमारे ५०कोटी नागरिक हे वृत्तपत्रांचे वाचक आहेत असे साधारणपणे मानले जाते.



दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांची संख्याही भारतात भरपूर वाढलेली आहे. भारतात, साधारणपणे विविध भाषांमधील ५०० वाहिन्या असून त्यातील सुमारे ८१ वाहिन्या बातम्या देणा-या आहेत. भारतात सुमारे १५ कोटी घरांमध्ये दूरचित्रवाणीचे संच आहेत. एका घरात पाच प्रेक्षक आहेत असे धरले तर ७५ कोटी नागरिक दूरचित्रवाणीवरील कोणते ना कोणते कार्यक्रम बघतात, असे गणित मांडता येईल. आकाशवाणीचाही विचार इथे करावा लागेल. खाजगी क्षेत्रांमधील सुमारे ३३८ आकाशवाणी वाहिन्या आहेत. ‘ऑल इंडिया रेडिओ’चा विस्तार तर झालेला आहेच. त्याचा ‘रीच’ ९९ टक्के म्हणजे संपूर्ण देशात पोहचलेला आहे. ही आकडेवारी तर फक्त पारंपरिक वा जुन्या माध्यमांची आहे ! या माध्यमांचे अर्थकारण त्यांच्या जाहिरातींवर अवलंबून आहे. वृत्तपत्राच्या एका अंकाची किंमत दोन वा तीन रुपये असली तरी त्याच्या निर्मितीचा खर्च हा ८ ते १५ रुपये असतो. त्यामुळे वृत्तपत्राच्या विक्रीमधून मिळणारी रक्कम ही कमीच असते आणि हा खर्च जाहिरातींद्वारे मिळणा-या पैशांमधून भरून काढला जातो.

हे अर्थकारण समजून घेतल्यानंतर खाजगी क्षेत्रातल्या माध्यमांवर कॉर्पोरेटचा प्रभाव कसा वाढतो ते समजणे अवघड नाही. हे वर्तमानपत्रांबाबतच घडते असे नाही तर दूरचित्रवाणी वाहिन्यांबाबतही तसेच घडते. वाचक अथवा नागरिक वृत्तपत्रे विकत घेत असले वा वाहिन्या पाहत असले तरी आपण माध्यमांचे ‘मुख्य ग्राहक’ नसतो. जाहिरातदार हे माध्यमांचे ‘मुख्य ग्राहक’ आणि आपण - सामान्य वाचक - हे अंतरिम ग्राहक ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जाहिरातदाराला आकर्षित करण्यासाठी आवश्यक असणारे वाचक/प्रेक्षक मिळविण्यासाठीच माध्यमांचे प्रयत्न असतात. स्वाभाविकच मुद्रित माध्यमांमधील मजकूरही ‘जाहिरातदार स्नेही’ वाचक/प्रेक्षक मिळविण्यासाठी दिला जाणार हे स्पष्ट होते.

भारतासारख्या देशात विविध समाजगटांच्या आशाअपेक्षा पूर्ण करणारा मजकूर एकाच अंकात देणे शक्य होत नाही. त्यामुळे मजकूर देताना प्राधान्यक्रम बदलतात. माध्यमांसाठी मुळातच एकजिनसी वाचक कधी नव्हतेच. त्यातच १९९०नंतर समाजात स्तरीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. एका बाजूला मोठे उद्योगपती, दुसरीकडे अगदी कनिष्ठ वर्गातील

वाचक तर मधल्या फळीत असलेले बहुसंख्य वाचक आणि त्यांच्यातही मोठ्या प्रमाणावर झालेले स्तरीकरण अशी ही बहुस्तरीय रचना आहे. अशा परिस्थितीत जाहिरातदारांना अपेक्षित नसलेल्या समाजघटकांकडे माध्यमे बव्हंशी दुर्लक्षच करतात. वाचकांना माहिती देणे, (to inform), समाजातील घडामोडींबाबत सजगता वाढवून त्यांचे शिक्षण-प्रबोधन करणे (to educate) आणि त्यांचे मनोरंजन करणे (to entertain) ही माध्यमांची प्रमुख कर्तव्ये/कामे मानली जात असत. तो काळ गेला हे नीटपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. आता मनोरंजनाला महत्त्व मिळत असल्याने माहिती व मनोरंजन (infotainment), शिक्षण व मनोरंजन (edutainmaent) असे शब्द वापरण्यात येतात. परिणामी, 'मनोरंजनाच्या वेष्टनात गुंडाळलेली माध्यमे' असे माध्यमांचे स्वरूप बनले आहे.

आता अशा परिस्थितीत वाचक/प्रेक्षक काय करतात याचाही विचार केला पाहिजे. वाचकांना माध्यमांचे वेगवेगळे पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे ते सतत surfing करत असतात. कधी एक वृत्तपत्र तर कधी दुसरे वृत्तपत्र ते घेतात. त्यामुळे अमूक एकच वर्तमानपत्र वाचायचे अशी सवय मोडते आहे. Brand loyalty ही तेवढी महत्त्वाची राहिलेली नाही. वाहिन्यांबाबतही असेच घडते आहे.

आता नवमाध्यमांचा विचार करू. इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या व्यासपीठांबाबत इथे विचार केला आहे. १९९०च्या दशकात सुरु झालेल्या ब्लॉग्जचा वापर आज अनेक जण करीत आहेत. २००४साली चालू झालेल्या फेसबुकचे आज जगभरात ७५ ते ८० कोटी 'ॲक्टिव्ह यूजर्स' आहेत. याची व्याप्ती वाढतेच आहे. ट्विटरवर दररोज २० कोटी ट्विट्स् (म्हणजे इंटरनेटवरील एसएमएस) पाठविले जातात. व्हिडिओ 'अपलोड' करण्यासाठी 'यू ट्यूब' तर छायाचित्रांसाठी 'फ्लिकर' आहे. ऑगस्ट २०११ पर्यंत सुमारे ६ अब्ज छायाचित्रे इथे 'अपलोड' झालेली आहेत. यात सतत भर पडते आहे. याचा परिपाक असा की 'यूजर जनरेटेड कन्टेट' (UGC) तयार होतो आहे. त्याला जगभरातून वाचक/प्रेक्षक मिळतो आहे. अलीकडच्या काळातील जपानमधील भूकंपाचा व्हिडिओ सुमारे दीड कोटी वेळा पाहिला गेला, हे याचे एक उदाहरण आहे.



या माध्यमातून माहितीचा प्रसार होतो तसेच मनोरंजनाची बाजारपेठही विस्तारते. 'कोलावेरी डी' या गाण्याचा प्रसार जगभरात याच माध्यमातून मोठ्या प्रमाणावर झाला. एवढेच नव्हे तर ओसामा बिन लादेनला पकडण्यासाठी पाकिस्तानात कारवाई चालू होती, त्या वेळी 'माझ्या घरानजीक काहीतरी मोठी घटना घडते आहे', अशा प्रकारचे 'ट्विट' एकाने केले होते. अशा त्याच्या 'ट्विट्स्'द्वारे एक प्रकारे 'रिपोर्टिंग' झाले होते. बेकारी दूर करण्यासाठी निदर्शने झाल्यानंतर एका युवकाने ट्युनिशियात स्वतःला जाळून घेतले होते. त्यानंतर तो अत्यवस्थ होता. पण त्याच्या आईने त्या निदर्शनांचे चित्रण करून यू ट्यूबवर प्रसारित केले आणि मग 'अल् जझीरा'ने त्याची दखल घेतली. 'युझर जनरेटेड कन्टेट'चे महत्त्व समजून घेतले पाहिजे. त्यामुळे जुन्या माध्यमांतील संपादक, वार्ताहर, उपसंपादक अशी एक hierarchy होती, तिला आता धक्के बसत असल्याचे दिसते.

'अल् जझीरा'ने संबंधितांना योग्य श्रेय देऊन त्यांना एका प्रकारे आपल्या कामकाजात सहभागी करून घेतले. आपल्या कामात सोशल मीडियाचा उपयोग कसा करून घ्यायचा याचे प्रशिक्षण त्यांनी आपल्या कर्मचा-यांना दिले होते. 'सीएनएन'चीदेखील 'आय रिपोर्ट' अशी यंत्रणा असून त्याचे जगभरात सुमारे ७५ हजार स्वयंसेवक वार्ताहर आहेत. त्यांना त्यांचे मानधन दिले जाते असेही नाही. पण आपल्याला काहीतरी समजले, माहिती झाले ते सांगण्याची ऊर्मी माणसांमध्ये सहजपणे असते, तिचा उपयोग करून घेणे शक्य असते. हे 'सीएनएन'ने समजून घेतले. जपानमधील भूकंपाचा व्हिडिओ करणारी व्यक्ती ही 'सीएनएन'ची स्वयंसेवक वार्ताहर होती. त्या व्यक्तीने हा व्हिडिओ 'सीएनएन'ला दिल्यानंतर 'सीएनएन'ची लोकप्रियता त्या काळात मोठ्या प्रमाणावर वाढली. अशा प्रकारे 'लोकसहभाग' हा मुख्य पाया असलेले असे अनेक प्रयत्न जगभरात होत असून काही वेबसाइट्स्ही अशी सुविधा उपलब्ध करून देत आहेत.

सोशल मीडियाचा प्रसार भारतातही झाला असून सुमारे ११ कोटी नागरिक इंटरनेट नियमितपणे वापरतात असे एका सर्वेक्षणावरून दिसते. मोबाइल वापरणा-यांची संख्याही वाढते आहे. मोबाइलचे 'पेनिट्रेशन'

सुमारे ७० टक्के आहे. मोबाइलवर इंटरनेटची सुविधाही मिळू शकते. शहरी आणि ग्रामीण असा भेद कमी करणारे हे एक माध्यम आहे. मोबाइल हा केवळ एक फोन नसून ते एक मल्टिमीडिया उपकरण आहे. तंत्रज्ञान जसेजसे विकसित होत जाईल तसेतशा मोबाइल व अन्य सुविधा स्वस्त होत जातील हेदेखील इथे लक्षात घेतले पाहिजे. फेसबुक वापरणा-यांची संख्याही भारतात वाढत असून आजमितीस सुमारे २ कोटी ८० लाख भारतीय फेसबुकचे सदस्य आहेत. अर्थातच, तरु ण पिढीचे लोक त्यात जास्त आहेत. परंतु, काही ज्येष्ठ नागरिकही त्यात सहभागी होऊ लागले आहेत. या सर्वांचा परिणाम जुन्या माध्यमांवर होतो आहे. वृत्तपत्रांचा विस्तार होत असल्याने अंकविक्रीमधून मिळणारे उत्पन्न काही प्रमाणात वाढले असले तरी एकेका माध्यमसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांतील या घटकाचे प्रमाण घटलेले आहे. कारण, अन्य खर्च ज्या प्रमाणात वाढत आहेत त्या प्रमाणात वृत्तपत्रांच्या/नियतकालिकांच्या किंमती वाढलेल्या नाहीत. त्या किंमती वाढवल्या तर वाचक/ग्राहक नाराज होण्याची शक्यता असते. जाहिरातींमधून मिळणारे एकूण उत्पन्न वाढलेले असले तरी (मोजके अपवाद वगळता) एकेका माध्यमसंस्थेचे जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न कमी होऊ लागले आहे. कारण, स्पर्धा वाढलेली आहे.

दुसरा मुद्दा 'पेज-३' पत्रकारितेचा आहे. आज बहुसंख्य माध्यमसंस्थांच्या मालकांचे आर्थिक हितसंबंध मनोरंजन आणि बातम्या या दोन्ही क्षेत्रांत अडकलेले आहेत. पण पैसा मुख्यतः मिळतो तो मनोरंजनाच्या क्षेत्रांतून. त्यामुळे त्याला अनुरू प असा मजकूर आपल्या वृत्तपत्रांमधून/नियतकालिकांमधून यावा असे त्यांना वाटते. आता असा मजकूर फक्त 'पेज-३'पुरता मर्यादित राहिलेला नाही. तो 'पेज-१'वरही असू शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे. पुढचा मुद्दा येतो तो 'पेड न्यूज'चा. इथे 'फॉलो द लीडर' असे काहीसे घडते आहे. म्हणजे, बेनेट-कोलमनसारख्या एखाद्या माध्यमसंस्थेला 'मीडियानेट'सारखे जे जमते ते माझ्या माध्यमसंस्थेला का जमू नये असे म्हणून 'ते करतात तसे' काही करण्याचा इतर अनेक माध्यमसंस्थांकडून प्रयत्न होतो. यातून 'पेड न्यूज'ची प्रकरणे घडतात. त्यामुळे काही बातम्या या खरे तर



जाहिरातीच असतात. वाचक/प्रेक्षक मिळविणे व टिकविणे हा टेलिव्हिजन चॅनेल्सपुढचा एक प्रश्न आहे. स्पर्धा वाढलेली आहे आणि वाचकांची brand loyalty कमी होत जाते आहे. त्यामुळे कधी कधी प्रेक्षकांनादेखील टाळ्या वाजविण्यासाठी पैसे देऊ न कार्यक्रमात सहभागी करू न घेतले जात असते. ही 'पूर्वनियोजित उत्स्फूर्तता' असते. वृत्तपत्रांच्या क्षेत्रात वाचकांना बांधून ठेवण्यासाठी त्यांचे क्लब स्थापन करणे, त्यांना सहलीला नेणे असे काही प्रकार केले जात आहेत.

या पार्श्वभूमीवर लोकशाही व लोकसहभागाचा विचार करताना असे दिसते की सर्वसामान्य माणसाला खूप विविध प्रकारची माहिती मिळू लागली आहे. त्याच्या हाती आता विविध प्रकारची साधनेही आली आहेत. त्यामुळे माहितीची देव-घेव करण्यासाठी तो सज्ज झाला आहे/होतो आहे. हे खरे असले तरी यांतील एक बाब अशी की सर्वसाधारणपणे गप्पांच्या कट्ट्यांवर जसे बोलले जाते तसे खूप वेळा इंटरनेटवर बोलले/लिहिले जात असते. फक्त इंटरनेटवरच नव्हे तर वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्याबाबतही असे घडू लागले आहे. ट्विटरचे उदाहरण पाहिले तर असे दिसते की सुमारे ४० टक्के ट्विट्स् हे निरर्थक असतात. ३८ टक्के ट्विट्स् हे इतरांबरोबर संभाषण वा संवाद साधण्यासाठी असतात. तर फक्त ४ टक्के ट्विट्स् बातम्या म्हणून महत्त्वाचे असतात.

या शिवाय, कोणत्याही घडामोडींवर भाष्य करणे असा एक (हौशी) प्रकार घडतो. असे करताना काही योग्य माहिती मिळवून, विश्लेषण अभ्यास करून मत मांडले जातेच असे नाही. विविध प्रकारच्या माध्यमांमध्ये सहभागी होणा-या ज्या व्यक्ती आहेत त्यातही दोन गट आहेत असे दिसते. म्हणजे, माध्यमांतून केवळ मूकपणे माहिती मिळविणारे (consumers), आणि माध्यमांमध्ये स्वतःही भर घालणारे (prosumers) अशी ही विभागणी दिसते. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सुस्थितीतील नागरिक या दुस-या गटात आहेत, ही वस्तुस्थिती आहे. पण यात बदल होईल/व्हायला हवा. या सर्व प्रक्रियेत कुठलाही सहभाग नसणारे/आवाज नसणारे गट सहभागी होतील तेव्हा अपेक्षित असे परिवर्तन घडू शकेल. समाज जसजसा सुशिक्षित होईल तसतसे हे घडण्याच्या शक्यता वाढतील. *(पृष्ठ ३७वर)*

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

# महाराष्ट्रातील बिगर शेती रोजगार

**- डॉ. शरदिनी रथ**

## (१) रोजगार, उद्योग आणि शहरीकरण

उदारीकरणाची पावले भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रांगणात उमटल्याला २०११ सालातील जुलै महिन्यात दोन दशके उलटून गेली. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या या दोन दशकी वाटचालीदरम्यान भारतीय अर्थकारणात जे नानाविध बदल घडून आले त्या बदलांचा वेध घेण्या-या भारतीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासक-निरीक्षकांच्या भूमिकेत, या २० वर्षांत, एक बदल घडून आल्याचे ठळकपणे प्रतीत होते. रोजगार निर्मिती, कामगारांना मिळणारे वेतन, अर्थव्यवस्थेतील विषमता... अशांसारख्या मुद्यांकडून विश्लेषणाचा झोत आताशा भारताच्या ठोकळ देशी उत्पादिताच्या वार्षिक वाढीचा सरासरी दर, देशी तसेच विदेशी गुंतवणुकीचे आकारमान, शेअर बाजारातील चढउतार... यांसारख्या पैलूंकडे वळला असल्याचे प्रकर्षाने जाणवते. या व यांसारख्या अन्य पैलूंसंदर्भातील लेखन-विवेचनाला आजच्या माध्यमांमध्येही मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे दिसते.

---

**ज्येष्ठ व विख्यात अर्थतज्ज्ञ आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २३ व २४ सप्टेंबर २०११ अशा दोन दिवशी एका राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. (१) महाराष्ट्रातील नागरीकरण (२) महाराष्ट्रातील औद्योगिक रोजगार आणि (२) राष्ट्रीय वाहतूक धोरण हे तीन बीजविषय या परिसंवादासाठी निश्चित करण्यात आले होते. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीशी संलग्न असलेल्या डॉ. एस्. श्रीरामन, अभय टिळक व डॉ. शरदिनी रथ तीन अभ्यासकांनी या परिसंवादात केलेल्या सादरीकरणाचा निवडक अंश 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी गेल्या अंकापासून देत आहोत. - संपादक**



माध्यमे तसेच विद्यापीठीय अध्यापन-संशोधनाच्या क्षेत्रातील काही धुरीणांनीही या परिवर्तनाचा मोठ्या हिरिरीने अंगीकार-पुरस्कार केल्यामुळे, या आर्थिक स्थित्यंतरादरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेत उदयाला आलेला नवप्रवर्तकांचा वर्ग, देशाच्या ठोकळ देशी उत्पादिताच्या जडणघडणीत वस्तुनिर्माण उद्योग तसेच सेवाउद्योगांचा वाढता असलेला सहभाग ... अशांसारख्या विषयांच्या अंगोपांगांचे विश्लेषण करण्याकडे या धुरीणांचे लक्ष विशेषत्त्वाने आकर्षित झाल्याचे अनुभवास येते. अर्थव्यवस्थेतील वस्तुनिर्माण उद्योग आणि सेवाउद्योगासारखी बिगर शेती व्यवसायक्षेत्रे हीच अर्थव्यवस्थेची खरी तारणहार असल्याची धारणा त्यामुळे व्यापक स्तरावर निर्माण झालेली दिसते. त्याच वेळी आपल्या देशातील बहुस्तरीय विषमतेमध्ये गेल्या २० वर्षांत वाढच झाल्याचे वास्तव सामोरे येते. या बहुस्तरीय विषमतेच्या उच्चाटणासाठी तितकेच बहुआयामी प्रयत्न करावे लागणार असले तरी, आपल्या देशातील रोजगारनिर्मिती आणि त्या रोजगाराची गुणवत्ता हा वाढत्या आर्थिक विषमतेवर अंकुश ठेवण्याच्या चर्चेच्या केंद्रस्थानी असणारा मुद्दा आहे, ही बाब लक्षात घ्यायलाच हवी. देशातील आर्थिकदृष्ट्या उत्पादक आणि रोजगारक्षम वयोगटात असणा-यांपैकी बहुसंख्यांना जोवर उत्पादक स्वरूपाचा, नियमित आणि रास्त मेहेनताना मिळवून देणारा रोजगार व रोजगार संधी उपलब्ध होत नाहीत तोवर आपली समाजव्यवस्था विषमतापूर्ण राहणार, हे कठोर वास्तव आपल्याला मान्य केलेच पाहिजे. आपल्या देशातील गरिबी हे याच आर्थिक विषमतेचे अपत्य होय.

रोजगाराच्या याच विलक्षण कळीच्या मुद्द्याबाबत या ठिकाणी आपण ऊहापोह करणार आहोत. आपल्या अर्थव्यवस्थेतील होतकरूंच्या हातांना आजमितीस रोजगार उपलब्ध होतो आहे का, रोजगार मिळत असेल तर तो कोठे मिळतो आहे, १२० कोटींएवढी अवाढव्य लोकसंख्या असणा-या या देशातील रोजगारेच्छूंना कशा प्रकारचा रोजगार आज मिळतो आहे, आपल्या देशातील बहुचर्चित आणि प्रतिष्ठित अशा बिगर कृषी क्षेत्राचे या रोजगारनिर्मितीमध्ये नेमके काय आणि किती योगदान आहे... यांसारख्या पैलूंबाबत उपलब्ध अधिकृत आकडेवारीच्या साहाय्याने आपण संबंधित वास्तवाचे अंतरंग न्याहाळण्याचा प्रयत्न करणार आहोत.

उद्योग, उद्योगांचा विस्तार आणि नागरीकरण यांचा निकटचा सहसंबंध असल्याचा जगभरातील दाखला आहे. नगर-महानगरांकडे ज्या प्रमाणे उद्योग आकर्षित होतात त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांच्या सभोवताली नागरी केंद्रांची वाढ होते. त्या ठिकाणचे उद्योग जसजसे वाढतात-बहरतात तसतशी ती नागरी केंद्रे यथावकाश वाढू लागतात. त्यामुळे, शहरांचा अभ्यास हा रोजगारनिर्मितीच्या बाबतीत बिगर शेती उद्योगव्यवसायांनी बजावलेल्या कामगिरीच्या अध्ययनाचा एक चांगला निदर्शक ठरू शकतो. अगदी थेट स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच उद्योगधंदे आणि नागरीकरण यांत महाराष्ट्र अग्रेसर राहिलेला आहे. मुंबई हा महाराष्ट्राच्या अशा केंद्रीभूत औद्योगिक आणि नागरी विकासाचा चेहराच जणू. परंतु, अलीकडील दोन-तीन दशकांत उद्योगधंदे आणि त्यांच्या जोडीनेच नागरीकरणाचाही राज्याच्या अन्य भागांत वेगाने विस्तार झाल्याचे आपण पाहतो आहोत. परिणामी, विस्तृत औद्योगिक पाया लाभलेले आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेत देशभरात अग्रगण्य असलेले राज्य, असा आजच्या महाराष्ट्राचा लौकिक आहे.

शहरी महाराष्ट्रात सक्रिय असलेल्या बिगर शेती उद्योगव्यवसायांतील रोजगारात गेल्या दोन दशकांदरम्यान साकारत असलेल्या बदलांमध्ये कशाप्रकारचे कल दृग्गोचर होतात, याचा अभ्यास करणे म्हणूनच उद्बोधक ठरते. किंबहुना, या क्षेत्रात उभ्या देशभरातच साकारत असलेल्या कलांचे सूचन त्याद्वारे घडू शकेल. उद्योगव्यवसायघटकांचे स्थानांकन हा या संदर्भात अलीकडील काळात विशेष अध्ययनाचा प्रांत ठरतो आहे. कोणत्या ठिकाणी आपला उद्योगव्यवसाय स्थापन करावयाचा यांबाबत निर्णय घेत असताना उद्योजक अनेक पैलूंचा विचार करीत असतो. पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता, हा त्यातील एक महत्त्वाचा निकष. रस्ते, रेल्वे, पाणी, वीज यांसारख्या सुविधांप्रत सुलभ आणि रास्त दराने 'ॲक्सेस' ही उद्योगांची एक मुख्य गरज असते. कच्च्या मालाचा पुरवठा सहजपणे होऊ शकेल असे ठिकाण जवळ असणे ही काही उद्योगांची गरज असू शकते. बाजारपेठेचे साहचर्य हा काहींच्या लेखी कळीचा मुद्दा असतो. तर, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता हा काही उद्योगांच्या दृष्टीने मोलाचा ठरतो. स्थानांकनाबाबतच्या निर्णयावर असे अनेक घटक आपापला प्रभाव टाकत असतात.



बिगर शेतीक्षेत्रात रोजगारनिर्मिती घडवून आणण्याबाबत उद्योगव्यवसायांनी बजावलेल्या कामगिरीचे परीक्षण करीत असतानाच, या उद्योगव्यवसायांचा विस्तार राज्याच्या विविध भागांत कशा प्रकारे घडून आलेला आहे, याचा मागोवा घेणेही तितकेच रोचक ठरते. राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय ठोकळ उत्पादिताच्या जडणघडणीत वस्तुनिर्माण उद्योग तसेच सेवाउद्योगांचे असणारे योगदान हा जर आपण 'विकासा'चा मापदंड मानणार असू तर, या विकासाचे राज्यपातळीवरील प्रादेशिक परिमाण अभ्यासणेही तितकेच महत्त्वाचे आणि मुख्य म्हणजे उद्बोधक ठरावे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असणा-या महाराष्ट्रासारख्या राज्यातील वेगवेगळ्या विभागांत उद्योगधंद्यांचा विस्तार (वस्तुनिर्माण उद्योग तसेच सेवाउद्योग) कशा प्रकारे घडून आलेला आहे, उद्योगांचे स्थानांकन आणि विकास या संदर्भात राज्याच्या विविध भू-विभागांत संतुलन आढळून येते का, मुंबईच्या उंब-याआतच जणू जखडून पडलेली आर्थिक-औद्योगिक विकासाची प्रक्रिया त्या उंब-याबाहेर पडते आहे अथवा नाही.... अशांसारख्या काही कळीच्या मुद्यांवर त्यामुळे काही प्रकाश पडू शकेल.

या अभ्यासासाठी आवश्यक असणारी अधिकृत सांख्यिकी उपलब्ध करून देणारे आपल्या देशातील स्त्रोत म्हणजे, (अ) आर्थिक गणना अहवाल - इकॉनॉमिक सेन्सस् (ब) जनगणना अहवाल - पॉप्युलेशन सेन्सस् आणि (क) उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणांचे अहवाल - ॲन्युअल सर्व्हे ऑफ इंडस्ट्रीज्. १९९८ आणि २००५ अशा दोन वर्षी देशभरात आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणना अहवालांद्वारे उपलब्ध होणारी आकडेवारी या ठिकाणी वापरलेली आहे. तसेच, १९९१ आणि २००१ या दोन वर्षांसाठीच्या जनगणना अहवालांतील माहितीचाही आधार घेतलेला आहे. राज्यातील बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या नानाविध पैलूंवर या वेगवेगळ्या स्त्रोतांद्वारे उपलब्ध होणारी अधिकृत माहिती बहुमोल प्रकाश टाकते. राज्याच्या नागरी विभागांत कार्यरत असणा-या बिगर शेती उद्योगव्यवसायांचे वैविध्यपूर्ण चित्र आकडेवारीसह साधार सादर करणे, हा या अभ्यासाचा हेतू होय. विद्यमान तसेच भूतकालीन धोरणांची चर्चाचिकित्सा करणे अशा अभ्यासामुळे शक्य होऊ शकेल.

# (२) आकडेवारीद्वारे सामोरे येणारे वास्तव

नागरीकरणाच्याबाबतीत महाराष्ट्र देशभरात पूर्वापारच आघाडीवर आहे. २००१ सालच्या आकडेवारीनुसार राज्याची नागरीकरणाची सरासरी पातळी ४२.४३ टक्के इतकी होती. लोकसंख्या आणि श्रमिकांचा विचार केला तर, १९९१ ते २००१ या दहा वर्षांच्या कालावधीत या दोहोंमध्ये ग्रामीण महाराष्ट्रात जेवढी भर पडली त्यापेक्षा अधिक भर ही शहरी महाराष्ट्रात पडल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते. ग्रामीण महाराष्ट्रातील श्रमिकांचे चित्र बघितले तर तिथे ब-याच अंशी स्थितीशीलता आढळून येते. १९९१ ते २००१ या दशकभरादरम्यान ग्रामीण महाराष्ट्रातील शेतक-यांच्या संख्येत वाढ घडून आल्याचे आकडेवारीवरून दिसत नाही. ग्रामीण महाराष्ट्रातील शेतमजुरांच्या संख्येतही या दशकभरादरम्यान घटच घडून आली. मुख्य श्रमिकांच्या संख्येत या दशकभरादरम्यान जी भर पडली त्यांपैकी बहुतांश भर ही राज्याच्या शहरी भागांतच पडली. इथे एका गोष्टीचा उलगडा करणे उपयुक्त ठरेल. जनगणना ज्या तारखेस केली जाते त्या तारखेच्या आधीच्या वर्षभरात ज्या व्यक्तींना किमान १८० अथवा त्यांपेक्षा अधिक दिवस रोजगार मिळालेला असतो अशा सर्व व्यक्तींना जनगणना अहवालांत 'मुख्य श्रमिक' (मेन वर्कर्स) म्हणून निर्देशित केले जाते. तर, जनगणनेपूर्वीच्या वर्षभरादरम्यान १८० दिवसांपेक्षा कमी दिवस रोजगार मिळालेल्या व्यक्तींचा निर्देश 'सीमान्त श्रमिक' (मार्जिनल वर्कर्स) म्हणून केला जातो.

राज्यातील शहरी भागांतील मुख्य श्रमिकांमध्ये संख्यात्मक प्राबल्य राहिले ते बिगर शेती उद्योगव्यवसायांतील श्रमिकांचे. जनगणना अहवालांत अशा श्रमिकांना 'अन्य श्रमिक' (अदर वर्कर्स) असे संबोधले जाते. ग्रामीण भागांचा विचार केला तर, एकीकडे शेतमजुरांच्या संख्येत घट घडून आली तर दुसरीकडे अन्य श्रमिकांच्या संख्येत तुलनेने अधिक प्रमाणात वाढ घडून आली. असे असले तरी, राज्यभरातील अन्य श्रमिकांमध्ये शहरी महाराष्ट्राचा १९९१ साली असणारा ७०.७७ टक्क्यांचा तौलनिक हिस्सा वाढून २००१ साली ७२.७७ टक्क्यांवर पोहोचलेला दिसतो.



बिगर शेती उद्योगव्यवसायांमध्ये रोजगारनिर्मिती करण्यात राज्यातील शहरी भागांचा वरचष्मा राहिलेला दिसतो. रोजगाराचे सीमान्तीकरण घडून येण्याची प्रक्रिया सर्वत्रच मोठ्या प्रमाणावर घडून येत असल्याचे चित्र या दशकभरादरम्यान आढळून आलेले असले तरी, महाराष्ट्राच्या शहरी विभागांतील सीमान्त श्रमिकांचा राज्यातील एकंदर सीमान्त श्रमिकांमध्ये असलेला तौलनिक हिस्सा त्या मानाने १५ टक्के इतका अत्यल्पच असल्याचे आकडेवारी सांगते. राज्याच्या शहरी लोकसंख्येमधील वाढ, शेतीक्षेत्रातील रोजगारवाढीच्या जवळपास शिगोशीग भरलेल्या वा कुंठित झालेल्या क्षमता आणि बिगर शेती क्षेत्रातील व्यवसायपेशांची धीमी आगेकूच ही १९९०च्या दशकातील महाराष्ट्राच्या वाटचालीची मुख्य कथागाथा होय.

या सगळ्या वास्तवाच्या प्रादेशिक परिमाणाचे बारकाईने अवलोकन-अध्ययन करणे, या ठिकाणी उपयुक्त ठरेल. मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर हे राज्यातील चार जिल्हे औद्योगिकदृष्ट्या पूर्वापारच सर्वाधिक विकसित गणले जातात. शहरीकरणाच्या विकास-विस्तारातही हेच चार जिल्हे राज्यभरात अग्रमानांकित राहिलेले आहेत. १९९१ ते २००१ या संपूर्ण काळात या चित्रात काहीही बदल झाल्याचे दिसत नाही. उलट, २००१ सालापर्यंत या चार जिल्ह्यांची या संदर्भातील प्रवृत्ती १९९१च्या तुलनेत अधिकच सघन झाल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते.

महाराष्ट्रातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी जवळपास ६० टक्के शहरी लोकसंख्या याच चार जिल्ह्यांमध्ये एकवटलेली आहे. मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर या चार जिल्ह्यांतील शहरी भागांमध्ये सामावलेल्या मुख्य श्रमिकांचा राज्यातील एकंदर मुख्य श्रमिकांमध्ये असणारा तौलनिक वाटा १९९१ ते २००१ या कालावधीत ६३.५४ टक्क्यांवरून ६४.२० टक्क्यांवर पोहोचला. याचाच अर्थ असा की, राज्यातील उर्वरित २६ जिल्ह्यांचा राज्यातील एकंदर शहरी मुख्य श्रमिकांमध्ये असणारा वाटा या दशकभरात ३७.४६ टक्क्यांवरून (१९९१) ३५.८० टक्क्यांवर (२००१) घसरला. राज्यातील एकंदर बिगर शेती श्रमिकांपैकी (अन्य श्रमिक) तब्बल ६६ टक्के अन्य श्रमिक याच चार जिल्ह्यांमध्ये एकवटलेले आहेत. इथे आवर्जून नोंदविण्यासारखी एक बाब म्हणजे, रोजगाराचे सीमान्तीकरण घडून येण्याची

प्रवृत्ती मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर या चार जिल्ह्यांमध्ये तुलनेने कमी दिसते. राज्यातील एकंदर सीमान्त श्रमिकांमध्ये या चार जिल्ह्यांतील सीमान्त श्रमिकांचे १९९१ साली असणारे ७२.२७ टक्के इतके तौलनिक प्रमाण २००१ सालच्या जनगणना आकडेवारीनुसार ५३.५५ टक्क्यांपर्यंत खाली घसरलेले दिसते. राज्याच्या ग्रामीण भागांतील रोजगाराचे एकीकडे घडून येत असलेले निकृष्टीकरण आणि दुसरीकडे, या चार जिल्ह्यांमधील बिगर शेती उद्योगव्यवसायक्षेत्राची सक्षम प्राणशक्ती यांचा प्रत्यय या चित्राद्वारे आपल्याला येतो.

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी विभागांचे अशाच प्रकारचे चित्र १९९८ आणि २००५ अशा दोन वर्षी आपल्या देशात घेण्यात आलेल्या आर्थिक गणनेच्या आकडेवारीचा आधार घेऊन तयार करणे आपल्याला शक्य आहे. जनगणना अहवालांद्वारे राज्यातील अन्य श्रमिकांसंदर्भात जे चित्र आपल्यासमोर उभरते त्यामागील वास्तवाचा उलगडा, काही अंशी का होईना, आपल्याला त्याद्वारे करून घेता येणे शक्य बनावे. राज्यातील बिगर शेती उद्योगव्यवसायांचे ग्रामीण आणि शहरी विभागांतील विभाजन १९९८ आणि २००५ या दोन्ही वर्षांत ब-यापैकी समसमान असल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते. केवळ इतकेच नाही तर, राज्यातील बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या संख्येत १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान जी वाढ घडून आली त्या वाढीचे राज्याच्या ग्रामीण आणि शहरी विभागांतील प्रमाणही जवळपास एकसारखेच असल्याचे (अनुक्रमे ३०.९३ टक्के आणि ३०.९१ टक्के) आपल्या ध्यानात येते.

उद्योगव्यवसायांत रोजंदारीवर नेमलेल्या श्रमिकांचा विचार केला तर, १९९८ साली असे बव्हंश मजूर हे राज्याच्या शहरी विभागांतील बिगर शेती उद्योगव्यवसायांत सामावून घेतले गेले होते, असे दिसते. त्याचप्रमाणे, दर उद्योगव्यवसाय घटकामागे काम करणा-यांची सरासरी संख्याही ग्रामीण भागांच्या तुलनेत राज्याच्या शहरी भागांत अधिक होती. मात्र, २००५ साली करण्यात आलेल्या आर्थिक गणनेची जी आकडेवारी उपलब्ध होते त्या सांख्यिकी नुसार या चित्रात मोठे चमत्कारिक बदल घडून आल्याचे प्रकर्षाने आढळून येते.



शहरी महाराष्ट्राच्या तुलनेत ग्रामीण महाराष्ट्रातील बिगर शेती उद्योगव्यवसायांत गुंतलेल्या श्रमिकांमध्ये (एकूण श्रमिक तसेच रोजंदारीवर नेमलेले श्रमिक) वाढ घडून आल्याचे चित्र २००५ सालच्या आर्थिक गणनेच्या अहवालानुसार स्पष्ट होते. या बाबतीत शहरी महाराष्ट्राची चांगलीच पीछेहाट झालेली दिसते. शहरी महाराष्ट्रातील बिगर शेती उद्योगव्यवसायांत रोजंदारीवर नेमण्यात आलेल्या श्रमिकांच्या संख्येत (१९९८च्या तुलनेत) २००५ साली ३.४ टक्क्यांची घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते. केवळ इतकेच नाही तर, बिगर शेती उद्योगव्यवसायांत गुंतलेल्या राज्यातील एकंदर श्रमिकांमध्ये शहरी विभागांतील बिगर शेती उद्योगव्यवसायांत रोजीरोटी कमावणा-यांचा १९९८ साली ६४.६९ टक्के इतका असणारा वाटा २००५ साली ६०.८८ टक्क्यांपर्यंत खाली घसरल्याचे वास्तव आपल्यासमोर येते. रोजंदारीवर श्रमिक नेमण्याबाबतची राज्यभरातील एकंदरच बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांची क्षमता १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान दर उद्योगव्यवसाय घटकामागे सरासरी ३.२३ श्रमिकांवरून २.६७ श्रमिकांपर्यंत घसरल्याचे दिसते. परंतु, त्यांतही पुन्हा शहरी भागांतील बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांच्या या क्षमतेमध्ये याच कालावधीत घडून आलेली घट ही अधिक लक्षणीय ठरते. राज्याच्या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या नानाविध बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांमध्ये, स्वयंरोजगार तत्त्वावर खुद्द प्रवर्तकानेच चालू केलेल्या व्यवसायांचे प्रमाण तुलनेने सर्वाधिक राहिलेले दिसते. परिणामी, बाहेरील श्रमिकाला रोजंदारीवर नेमण्याची अशा उद्योगव्यवसायघटकांची क्षमता ही तशी तुटपुंजीच असल्याचे ध्यानात येते.

आर्थिक गणनेद्वारा हाती येणारी ही आकडेवारी मोठी बोलकी आहे. १९९८ आणि २००५ या दोन वर्षांसाठीची सांख्यिकी बघितली तर एक बाब मनावर ठसते ती अशी की, ग्रामीण भाग असो वा शहरी राज्यात एकंदरीनेच स्वयंरोजगाराच्या तत्त्वावर प्रवर्तित करण्यात आलेल्या बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांचे प्रमाण एकूणांत चांगलेच बलिष्ठ आहे. अशा उद्योगांमध्ये बव्हंशी मालकच काम करत असतो. रोजंदारीवर बाहेरून घेतलेला एकही कामगार अशा व्यवसायघटकांमध्ये आढळून येत नाही.

या प्रकारच्या उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येत, राज्यभरात, १९९८ ते २००५ या सात वर्षांच्या कालावधीदरम्यान ११ टक्क्यांची वाढ घडून आल्याचे दिसते. उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येचा विचार केला तर, १९९८ आणि २००५ या कालावधीत तुलनेने सर्वाधिक वाढ घडून आलेली दिसते ती रोजंदारी तत्त्वावर १ ते १० या संख्येदरम्यान श्रमिकांना कामावर घेणा-या उद्योगव्यवसायघटकांच्या गटात. राज्याच्या ग्रामीण भागात ही वाढ होती तब्बल ११५.५१ टक्क्यांची तर, शहरी विभागांत ही वाढ होती ६८.२६ टक्क्यांची. १०पेक्षा अधिक संख्येने श्रमिकांना रोजंदारीवर काम देणा-या उद्योगव्यवसायांच्या संख्येचा विचार केला तर या बाबतीत १९९८ साली वरचष्मा होता तो राज्यातील शहरी विभागांचा. मात्र, २००५ सालादरम्यान जी काही वाढ उद्योगव्यवसायांच्या या गटांतील संख्येत घडून आली ती सर्व अंशी राज्याच्या ग्रामीण भागांतच. या बाबतीत राज्यातील शहरी विभाग चांगलेच पिछाडीवर पडले. परिणामी, राज्यातील बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांमध्ये असलेले त्यांचे प्रमाण आणि उद्योगव्यवसायघटकांच्या वाढीचा सरासरी दर अशा दोहोंबाबतीत शहरी विभागांचा टक्का १९९८ ते २००५ यांदरम्यान घटलेला दिसतो.

महाराष्ट्रातील बिगर शेती अर्थव्यवस्थेच्या गतिशास्त्रात १९९१ ते २००५ या संपूर्ण कालावधीदरम्यान नाट्यपूर्ण असे स्थित्यंतर घडून आल्याचे या सगळ्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. या सगळ्या घडामोडींचा या क्षेत्राच्या रोजगारनिर्मिती क्षमतेवर लक्षणीय असा परिणाम घडून आल्याचाही अनुभव येतो. राज्याच्या शहरी भागांतील अन्य श्रमिकांच्या संख्येत ('अन्य श्रमिक' म्हणजेच बिगर शेती क्षेत्रांतील श्रमिक) १९९१ ते २००१ या कालावधीत मोठ्या संख्येने वाढ घडून आल्याचे २००१ सालच्या जनगणना अहवालांतील संबधित आकडेवारीवरून ध्यानात येते. परंतु, महाराष्ट्राच्या शहरी भागांत कार्यरत असणा-या बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांच्या रोजगारनिर्मिती क्षमतेमध्ये १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान घसरण झाल्याने शहरी श्रमदलात सामील झालेल्या या श्रमिकांना शहरांतील उद्योगव्यवसायघटकांत नियमित स्वरूपाचा रोजगार मात्र मिळत नसल्याचे या सगळ्यावरून निष्पन्न होते.



राज्याच्या ग्रामीण भागांतील अन्य श्रमिकांच्या संख्येत जी काही थोडीबहुत वाढ घडून आलेली होती ती वाढ जिरवून घेण्यास तिथे कार्यरत असणा-या बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येत साकारलेली वाढ बव्हंशी सक्षम होती, असे म्हणता येते. यावरून काढता येण्याजोगा एक सावध निष्कर्ष म्हणजे, शहरी विभागांत निर्माण झालेल्या रोजगारसंधी या बहुशः तात्कालिक (कॅज्युअल) स्वरूपाच्या होत्या वा आहेत तर; ग्रामीण भागांतील श्रमिकांना नियमित स्वरूपाचा रोजगार मिळविण्यात ब-याच अधिक प्रमाणात यश आलेले होते वा आहे.

राज्यातील अन्य श्रमिकांच्या संख्येत १९९१ ते २००१ या कालावधीदरम्यान ज्या वेगाने वाढ झाली तोच सरासरी वार्षिक वृद्धीदर वापरून १९९८ आणि २००५ या दोन वर्षांसाठीची अन्य श्रमिकांची अंदाजित (प्रोजेक्टेड) संख्या आपल्याला काढता येते. राज्यातील बिगर शेती उद्योगव्यवसायघटकांत नियमित स्वरूपाचा रोजगार मिळालेल्या श्रमिकांची संख्या आपल्याला १९९८ आणि २००५ या दोन वर्षांतील आर्थिक गणना अहवालांवरून मिळतेच. आर्थिक गणना अहवालांद्वारे मिळणारी नियमित श्रमिकांची ही संख्या, जनगणना अहवालांवरून १९९८ आणि २००५ या दोन वर्षांसाठी काढलेल्या अन्य श्रमिकांच्या अंदाजित एकंदर संख्येतून वजा केली की आपल्याला निखळ तात्पुरत्या श्रमिकांची १९९८ आणि २००५ या दोन वर्षांसाठीची अंदाजित संख्या काढता येते. १९९८ साली महाराष्ट्रात ५० लाख १७ हजार तात्पुरते (कॅज्युअल) श्रमिक तर १ कोटी ४ लाख ४४ हजार नियमित स्वरूपाचे (बिगर शेती उद्योगव्यवसायांत रोजगार मिळालेले) श्रमिक होते, असे अनुमान या आकडेमोडीवरून आपण काढू शकतो. तर, २००५ साली तात्पुरते श्रमिक आणि नियमित स्वरूपाचा रोजगार मिळालेले श्रमिक यांची संख्या वाढून अनुक्रमे ७७ लाख ८५ हजार आणि १ कोटी १३ लाख ८ हजार अशी झाल्याचे ध्यानात येते. म्हणजेच, राज्यातील तात्पुरत्या श्रमिकांच्या संख्येत १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान चांगली ५५.७१ टक्क्यांची वाढ घडून आली तर, दुसरीकडे, नियमित स्वरूपाचा रोजगार मिळालेल्यांच्या संख्येत याच काळात भर पडली ती केवळ ८.२७ टक्क्यांची, हाच याचा अर्थ ! ■■

*(पृष्ठ २६ वरून)*

सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी माध्यमांच्या संदर्भात आपल्या देशातल्या प्रादेशिक भाषा महत्त्वाची भूमिका बजावतील. माध्यमांमध्ये चांगले बदल घडून यावेत यासाठी विविध घटकांना विशेष प्रयत्न करता येतील. माध्यमसंस्थांची भूमिका त्यांच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधित असेल. मात्र, राजकीय नेत्यांनी नवे माध्यमविश्व समजून घेऊन समाजकारणाची कास धरली तर ते उपयुक्त ठरेल. तिसरा घटक म्हणजे समाजातील तज्ज्ञ व अभ्यासक व्यक्ती. आजच्या सर्व प्रकारच्या माध्यमांमधील 'कन्टेट' अधिक सकस बनावा यासाठी सर्वांनी विशेषतः, ज्यांचा व्यासंग मोठा आहे, अभ्यास आहे त्यांनी 'कन्टेट' निर्मितीमध्ये थेटपणे सहभागी होण्याची गरज आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी अधिक सकस मजकूर उपलब्ध होईल.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लोकांनीदेखील कृतिशील नागरिकाची भूमिका बजावली पाहिजे. ख-या राजकारणात (समाजकारणाला प्राधान्य देणा-या) जो सहभागी होतो तो 'नागरिक', हे मनापासून स्वीकारले पाहिजे. आजचे व उद्याचे येऊ घातलेले माध्यमयुग सर्वांचेच आहे. त्यामुळे आपापल्या क्षमतेनुसार सर्वांचा यात रचनात्मक सहभाग असला तर माध्यमविश्वात चांगले बदल घडून येतील. आशयघन लोकशाहीकडे वाटचाल होण्यासाठी 'कृतिशील नागरिकां'चा खूप मोठा सहभाग मोलाचा ठरेल.

■■


## दुसरी आवृत्ती प्रकाशित

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

# कर्ता-करविता

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये





**प्रमुख संदर्भ**

**(A) Websites :-** (1) www.turing.org.uk/turing
(2) http://plato.stanford.edu/entries/turing/



**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

**वि.म. दांडेकर नीळकंठ रथ**

**पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये**

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**■ THE GRAMMAR OF CASTE : Economic Discrimination in Contemporary India, authored by Ashwini Deshpande, Oxford University Press, New Delhi 110 001, 2011, pp. xxi+295, Price - Rs. 695/-**

जात नाही ती 'जात', अशीच मुळी 'जात' या सामाजिक वास्तवाची व्याख्या करावी लागते. समाजातील आर्थिक वास्तवात परिवर्तन घडून आले की त्या परिवर्तनाचे पडसाद त्या समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक.. अशा नानाविध व्यवस्थांमध्ये उमटणे स्वाभाविक ठरते आणि अपेक्षितही. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या गेल्या दोन दशकी वाटचालीदरम्यान इथे अवतरलेल्या बाजारपेठीय अर्थसंस्कृतीच्या प्रभावामुळे या भूमीतील जातिधिष्ठित, उतरंडप्रधान व्यवस्थेला धक्के बसू लागले आणि एकंदरच समाजात स्पर्धायुक्त समानतेकडे वाटचाल होण्याच्या प्रवृत्ती हळूहळू दृग्गोचर होऊ लागल्या, असे प्रतिपादन काही अभ्यासकांकडून केले जाताना दिसते. या पूर्वपक्षाची वास्तवातील यथार्थता तपासून बघण्याचा प्रयत्न करणारा प्रस्तुत ग्रंथ, त्यामुळेच, अर्थशास्त्राच्या अभ्यासक, अध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांइतकाच समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंशशास्त्रासारख्या अन्य सामाजिक शास्त्रांच्या प्रांगणात अध्ययन-अध्यापन करणा-यांनाही उपयुक्त ठरावा. बाजारपेठीय आणि स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेमध्येही जातिविचार आणि त्या विचारावर अधिष्ठित भेदाभेद व विषमतापूर्ण व्यवहार किती स्तरांवर सूक्ष्मासूक्ष्मपणे नांदू शकतो, याचा आढावा विविध प्रकारच्या अधिकृत सांख्यिकीद्वारे घेणारे हे संशोधन म्हणजे आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची सामाजिक-सांस्कृतिक अंगांनी केलेली चिकित्साच म्हणता येईल. समतापूर्ण समाजनिर्मितीसाठी राखीव जागांसारख्या उपायांच्या जोडीनेच समाजातील उत्पादक साधनसामग्रीचे फेरवाटप घडवून आणणे अपरिहार्यच ठरते, हा या संशोधनाचा एक निष्कर्ष आर्थिक धोरणविचारसंदर्भातील एक अ-लक्षित आयाम वाचकांसमोर मांडतो. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2010-2012
Posted at Market Yard P.S.O., Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया
●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन ●जया सागडे

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**